# प्रकरण दुसरे

# ज्ञानेश्वरांच्या गौळणींचे स्वरूप

## प्रकरण दुसरे

# ज्ञानेश्वरांच्या गौळणींचे स्वरूप

***प्रस्तावना*** -

'गौळण' म्हणजे काय ? गौळणींचा विकास कसा होत गेला ? मधुरभक्तीची भारतीय परंपरा, लोकगीतातील गौळण, तिचे स्वरूप, तिच्याशी साम्य असणारी संतांची गौळण व या सर्व गौळणींपेक्षा शाहीर कवींची गौळण कशी वेगळी आहे, या सर्व गोष्टींचा सविस्तर अभ्यास पहिल्या प्रकरणात केला आहे. प्रस्तुत प्रकरणात ज्ञानदेवांच्या गौळणींचा अभ्यास अभिप्रेत आहे. तेव्हा त्यांच्या गौळणींचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. काव्यगुण वैशिष्टयांनी कशी नटली आहे. या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यापूर्वी त्यांच्या जीवन चरित्राचा व एकूण काव्यसंपदेचा आढावा घेतल्याशिवाय अभ्यासाला पूर्णत्व येणार नाही. तसेच 'ज्ञानदेव एक की दोन' या वादांचाही परामर्श घेण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

***ज्ञानेश्वरांचे जीवनचरित्र व ग्रंथकर्तृत्व*** -

आपल्या अलौकिक काव्यशक्तीने, साधुत्त्वाने आणि तत्त्वचर्चेने अवघ्या जगतास सन्मार्ग दाखविणाऱ्या श्रीज्ञानेश्वर महाराजांचा जन्म शके ११९७ साली आळंदी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रूक्मिणी आणि वडीलांचे नाव विठ्ठलपंत. हे घराणे मूळचे अपेगावचे असून मोठे सदाचारी व भगवद्भक्तिसंपन्न असे होते. ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना नाथपंथीय गोरक्षनाथांचा व आजोबा गोविंदपंत यांना गहिनीनाथांचा उपदेश होता. ज्ञानेश्वरांच्या आईचे वडील सिध्देश्वर कुलकर्णी हे आळंदीचे राहणारे होते.

ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांना बालपणीच वैराग्याचा व तीर्थाटनाचा छंद लागला. अशाच भ्रमंतीत असताना त्यांचा आळंदीशी संबंध आला. ज्ञानवैराग्याने संपन्न असलेल्या या तेजस्वी तरूणास तेथील सिधोपंत कुलकर्णी यांनी आपली मुलगी दिली. विठ्ठलपंत व रूक्मिणी यांचा संसार चांगला चालला पण नंतर विठ्ठलपंताचे मन संसारात रमेनासे झाले. हरि-

कीर्तन, सत्संग, वैराग्य यांचा नाद वाढीस लागला. याचा परिणाम असा झाला की, यात्रेच्या निमित्ताने ते काशीस गेले व तेथे श्रीपादस्वामीकडून संन्यास दीक्षा घेतली, परंतु या दीक्षेस पत्नीची संमती नाही असे समजताच श्रीगुरुनीच विठ्ठलपंताना परत गृहस्थाश्रम स्वीकारण्यास भाग पाडले. गुरुंची आज्ञा म्हणून, लोकांना विपरीत दिसला तरी विठ्ठलपंतानी संसार सुरू केल्यावर त्यांना श्रीनिवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी चार असामान्य अपत्त्ये झाली. लौकिक विरोधाला न जुमानता या भावंडाचे परमार्थनिरूपण व वैराग्यसाधन सुरू झाले. विहित धर्मशास्त्राप्रमाणे मुलांच्या मुंजी व्हाव्यात म्हणून प्रयत्न झाले. आपल्या कर्माची बाधा मुलांना होऊ नये म्हणून विठ्ठलपंत व रूक्मिणीबाई यांनी देहांत प्रायश्चित घेतले. तरी सुध्दा तत्कालीन ब्राह्मण समाजाने विठ्ठलपंतांच्या कुटुंबाला वाळीत टाकले मात्र पुन्हा आपल्यात सामावून घेतले नाही.

आता या लहान बालकांची माता, पिता आणि गुरुही थोरला भाऊ निवृत्ती यानेच जबाबदारी सांभाळली. मौजीबंधनासाठी परवानगी आणण्यासाठी पैठणला ही भावंडे गेली असताना तेथे काही चमत्कार करून त्यांनी सर्वांना दिपविले. या मूळच्याच शुध्द व पवित्र मुलांना शुध्द कोण करणार ! अशी भावनाही तेथे निर्माण झाली. भगवद्भक्तीचा, परमार्थ विचाराचा, भावार्थाचा मंगल वर्षाव त्यांना विशेषतः ज्ञानेश्वरांना करावयाचा होता म्हणूनच पैठणहून जेव्हा ते नेवासे या ठिकाणी आले तेव्हा त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला. अध्यात्माचे श्रवण मनन, भगवद्चिंतन, वैराग्यचर्चा, प्रापंचिकांचे दुःखनिवारण या कार्याबरोबरच निवृत्तीनाथांच्या कृपेने ज्ञानदेवांनी शके १२१२ मध्ये नेवासे मुक्कामी भगवद्गीतेवर मराठीत भाष्य लिहून फार मोठे अलौकिक कार्य केले. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी असे प्रमुख ग्रंथ त्यांनी लिहिले. यानंतर पंढरपूरचे थोर विठ्ठलभक्त नामदेव आणि ज्ञानदेव व इतर संत यांनी मिळून तीर्थयात्रा केल्या. एक ज्ञानाचे देव व एक नामाचे देव यांची तत्त्वचर्चा तर उफाळून आलीच, यातूनच त्यांनी तीर्थयात्रेत अभंगांची रचना केलेली असावी. ज्ञान व भक्ती यांचे मोठे समर्पक व मार्गदर्शक दर्शन त्यांच्या अभंगातून दिसते. 'बांधली सोडीत, बुढाली काढीत । आर्तांची साकडी फेडीत' ज्ञानेदवांची जीवनगंगा साऱ्या जगाला पावन करीत होती. पंढरपूरच्या विठ्ठलभक्तांच्या मेळाव्यास त्यांनी ज्ञानेश्वरीची तात्विक बैठक प्राप्तकरून देऊन भागवत धर्माच्या मंदिराची स्थापना केली

13793

आणि आपले अवतार कार्य संपलेले आहे, तेव्हा शके १२१८ (इ. स. १२९६) मध्ये कार्तिक वद्य त्र्ययोदशीस आळंदीस ज्ञानेश्वर समाधिस्थानात प्रविष्ट झाले.

***ज्ञानेश्वरांचे ग्रंथकर्तृत्व*** -

एकवीस वर्षाच्या आयुष्यात आपल्या लेखणीने मराठी साहित्यात अलौकिक ठसा उमटवून ज्ञानेश्वर अमर झाले. त्यांच्या नावावर आज ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, अभंग, हरिपाठाचे अभंग, गौळणी, विरहिणी इत्यादी काव्यलेखन उपलब्ध आहे. तेव्हा त्यांच्या प्रत्यक्ष ग्रंथाचाच आढावा थोडक्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

***ज्ञानेश्वरी*** -

गीतेच्या आठरा अध्यायातील सातशे श्लोकावर मूळ अध्याय आणि क्रम न बदलता नऊ हजार ओव्यांचे परमसुंदर भाष्य ज्ञानेश्वरांनी इ. स. १२९० (शके १२१२) मध्ये लिहिले आहे. मराठी भाषेचा अभिमान, कौतुक व्यक्त करणारी ज्ञानेशांची 'ज्ञानेश्वरी' मराठी साहित्यात अपूर्व आणि अजरामर कलाकृती आहे. अमृतालाही लाजवील अशा मराठी बोलाच्या मधुघटांतून अर्जुनरूपी मानव व श्रीकृष्णरूपी जगदीश्वर यामध्ये स्त्रवणाऱ्या निरूपम प्रेमाच्या जान्हवीचे निर्मळ जीवन विद्वानांपासून भोळ्याभाबड्यापर्यंत, अबालवृध्दापर्यंत सर्व थरातील लोकांना प्रिय ठरलेले आहे.

ज्ञानेश्वरीच्या नऊहजार ओव्यांतून नवरसांचे कल्लोळ निर्माण झालेले आहेत. विश्वकल्याणाची तळमळ व्यापून राहिलेली आहे. शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवणारी शांतीकथा -

का फेडित ताप-तापा । पोखीत तीरीचे पादपा ।
समुद्र जाय आपा । गंगेचे जैसे ।
नवरसा भरवी सागरू । का उचित रत्नांचे आगरू ।

अशा डौलाने वाहत जात आहे. गीता म्हणजे श्रीकृष्णार्जून संवाद आहे. विश्वंभर महाबोधाचा सुकाळ व्हावा हीच त्यांची इच्छा होती. 'गीताग्रंथ' हा जुना संस्कृतच. पण ज्ञानेश्वरांनी स्वत:च्या प्रतिभेने आणि अनुभूतीने झळाळणारे तत्वज्ञान त्यांनी या ग्रंथाच्या निमित्ताने लोकांसमोर मांडले.

'ब्रह्मसत्यं जगत् मिथ्या' हा शंकराचार्यांचा सिध्दांत मोडीत काढून 'अहं ब्रह्मास्मि' हा नवाच सिध्दांत त्यांनी ज्ञानेश्वरीत मांडलेला आहे. या विचारालाच 'चिद्‌विलासवाद' असे म्हणतात. हा विचार मांडताना उपमा-उत्प्रेक्षांची समर्पक योजना तर पानोपानी विखुरलेली आहे. उपमा-दृष्टांत तर या काव्याचे खास आकर्षण म्हणावे लागेल.

ज्ञानेश्वरीच्या शेवटी मागितलेल्या 'पसायदाना' मध्ये तर त्यांचे विश्वव्यापी मोठेपण, साधुत्व आणि शुचित्व दिसते. भक्त, तत्त्वज्ञ आणि कवी अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अंगे आपणास ज्ञानेश्वरी द्वारे ज्ञात होतात. ''कर्पुरात शुभ्रता, मृदुता व सौगंध्य याप्रमाणे ज्ञानेश्वरीत विद्वत्व, कवित्व आणि साधुत्व यांचा त्रिवेणी संगम झाला आहे.''[१] हे डॉ. तुळपुळे यांचे उद्‌गार त्यांच्या व्यक्तित्त्वाचा व ग्रंथाचा परिचय करून देतात.

*अमृतानुभव* -

ज्ञानेश्वरीच्या लेखनाचे स्वरूप भावात्मक होते आणि मूळ गीतेच्या आधारामुळे कांही बंधनांचीही आडकाठी होती. पण 'अमृतानुभवा'चे मात्र तसे नाही. ज्ञानेश्वरांच्या परिणत आणि पूर्णपणे स्वतंत्र अशा प्रज्ञेचा आविष्कार 'अमृतानुभवा'तून पहावयास मिळतो.

ज्ञानेश्वरीच्या पाठोपाठ म्हणजे इ. स. १२९२ (श. १११४) मध्ये या ग्रंथाची रचना झालेली असावी. पाच संस्कृत श्लोक आणि ८०४ ओव्या असलेला हा ग्रंथ एकून दहा प्रकरणात विभागलेला आहे. ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ केवळ पारमार्थिकांसाठी लिहिला आहे. आत्मप्राप्तीच्या श्रवणाचे मनन करून देऊन मुमूक्षाला स्वरूपप्राप्तीच्या स्वानंदाच्या भरात एकसारखे सुखमय होऊन राहता यावे. ही या ग्रंथलेखनामागची भूमिका आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरांचे स्वतंत्र असे, तत्वज्ञान शुध्द स्वरूपात याच ग्रंथात प्रगट झाले आहे. अमृतालाही लाळ उठवील असे अनुभवामृत पिऊन आपण जीवनुक्त व्हावे आणि त्याच्या सेवनाने सर्व विश्वाने स्वानंद सुखाचा क्षण उपभोगावा असे आत्मविश्वासपर उद्‌गार ज्ञानेश्वरांनी काढले आहेत. पुढे त्यांचा हा आत्मविश्वास इतका वाढला आहे की ते म्हणतात -

एवं दशोपनिषदे । पुढारा न ढाळती पदे ।
देखोनि बुडी बोधे । येथेचि दिधली ।

अशा स्वयंपूर्ण जाणिवेने ज्ञानेश्वरांनी येथे चिद्‌विलासवाद मांडला आहे. या ग्रंथाचे स्वरूप शुध्द तत्वज्ञानमय असल्यामुळे सामान्यजनांपेक्षा विद्वानांनाच तो अधिक प्रिय व्हावा यात नवल नाही.

***चांगदेवपासष्टी*** -

योगी चांगदेवाने ज्ञानदेवांना पाठविलेल्या कोऱ्या कागदावर त्यांनी जे पत्र चांगदेवाला लिहिले तेच 'चांगदेवपासष्टी' म्हणून प्रसिध्द आहे. या ग्रंथाची रचना इ. स. १२९४ (श. १११६) च्या सुमारास झाली असावी. अनुभवाने मोठ्या पण वयाने मात्र लहान असणाऱ्या ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद अशा संभ्रमात पडल्यामुळे शेवटी चांगदेवाने कोरेच पत्र ज्ञानेश्वरांकडे पाठवून दिले. हे उत्तरात्मक पत्र म्हणजेच 'चांगदेवपासष्टी' होय. पासष्ट ओव्यांतून येथे ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना पूर्ण बोध केला आहे.

चांगदेवा तुझेनि व्याजे । माऊलिया श्रीनिवृत्तिराजे ।
स्वानुभाव रसाळ खाजे । दिधले लोभे ।

असे विनयपूर्ण उद्‌गार काढून आपल्या लेखनाचे सारे श्रेय ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथ व चांगदेव यांना दिले आहे. ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञान जसे अमृतानुभवात साररूपाने आले आहे, तद्वतच अमृतानुभवातील तत्त्वज्ञान 'चांगदेवपासष्टी'त अधिक सूत्रमयपणे मांडले आहे. 'अमृतानुभवाचे तर्कशुध्दसार' असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. 'चिद्‌विलासवादाच्या भूमिकेतूनच पूर्णद्वैताचा बोध ज्ञानेश्वरांनी येथे केला आहे.

"ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यातील दृष्टांत आणि कल्पना याही प्रकरणात असून त्याची भाषा प्रसादिक व माधुर्यपूर्ण आहे. 'पासष्टी'तील मी आणि तू यांच्या ऐक्य प्रतिपादनाचे ज्ञानेश्वरांचे कौशल्य केवळ अपूर्व आहे."[२] असे तुळपुळे म्हणतात. "अमृतानुभवातील अजाद्‌वाद, स्फुर्तीवाद, नामरूपातीतवाद, परमात्म्याची अनिर्वचनियता इ. तत्त्वे 'चांगदेवपासष्टी'तही आढळतात. पासष्टीतील प्रत्येक ओळीस ज्ञानेश्वरीतून किंवा अमृतानुभवातून समानार्थक ओवी काढून दाखविता येईल."[३] हे डॉ. रा. द. रानडे यांचे मत या संदर्भात महत्त्वाचे आहे.

*ज्ञानेशांची अभंगवाणी -*

ज्ञानदेवांची अभंगवाणी ही प्रामुख्याने कीर्तन-प्रवचनासाठी जन्माला आली. संत नामदेवांच्या समवेत जेव्हा त्यांनी तीर्थयात्रा केल्या तेव्हाच त्यांच्या अभंगवाणीला बहर आलेला असावा असे वाटते. त्यांच्या उपलब्ध असणाऱ्या अभंगांची संख्या ७६५ इतकी आहे. बहुतेक अभंग सांप्रदायिक विषयांवर लिहिलेले असून आपली जीवनदृष्टी आणि तत्त्वबोध सर्वसामान्यांपर्यंत पोहचवावा, हा त्यामागील ज्ञानेश्वरांचा हेतू स्पष्ट दिसून येतो. त्यांचे बरेच अभंग कृष्णलीलावर्णनपर आहेत. हरीच्या सगुण-निर्गुण रूपांचे वर्णन अनेक अभंगात आलेले दिसते.

रूप पाहता लोचनी । सुख झाले हो साजणी ।
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।

हा अभंग तर कलात्मक सौदर्यांचा उत्कृष्ट नमुनाच म्हणावा लागेल. विठ्ठलवर्णन, पंढरीवर्णन, बालक्रीडेचे अभंग, पाळणा, मदालसा, घोंगडी, हमामा, फुगडी, वासुदेव, गौळण, विरहिणी, हरिपाठाचे अभंग इत्यादी प्रकारात त्यांनी अभंग लेखन केलेले आहे.

ज्ञानदेवांचा हरिपाठ तर वारकरी संप्रदायाची त्रिकाळ संध्याच म्हणावी लागेल. हे अभंग म्हणजे त्यांच्या अभंगवाणीतील स्वतंत्र प्रकरण म्हणावे लागेल. भागवत सांप्रदायिकांना अनुलक्षून वैराग्याचे बोल ज्ञानेश्वर येथे बोलतात -

देवाचिया द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।
हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।

यासारख्या अभंगातून परमार्थ अत्यंत साध्या आणि सोप्या शब्दातून विशद झाला आहे. त्यामुळे आजही सहृदय माणसाला ते आवडल्याशिवाय राहणार नाहीत. ''ही वाणी काव्यदृष्ट्या मोठी मनोरम असून तीत भावेनेची आर्तता, कल्पनेची विशालता आणि शब्दांची सुकुमारता या तिन्हीं गुणांचे प्रयाग साधले आहे.''[४] अशा मार्मिक शब्दात डॉ. तुळपुळे यांनी अभंगवाणीविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

***गौळण -***

परमेश्वराशी आत्यंतिक एकरूपता साधून त्याच्याशी रममाण होण्याचा प्रयत्न 'गौळणी'च्या स्वरूपात ज्ञानदेवांनी साकार केला आहे. मराठी गौळणीत या व्यक्तीपरत्वे भिन्न-भिन्न आहेत. इतर संतकवी व शाहीर कवी यांच्या गौळणीपेक्षा ज्ञानेदवांची गौळण ही वेगळी आहे. श्रोतृसापेक्ष हा भाव त्यांनी न वापरता जनमनासी संवाद न करता त्यांची गौळण ही मनमोहनाशी सुखसंवाद करते. या स्वरूपाच्या गौळणींचा सविस्तर अभ्यास पुढे केलेला आहे.

***विरहिणी -***

परमेश्वराच्या प्राप्तीसाठी व्याकुळ झालेल्या आणि त्याच्या विरहाने तळमळणाऱ्या भावुक भक्ताचे अंतरंग 'विरहिणीतून' ज्ञानदेवांनी मांडले आहे. या विरहिणीचा विरहभाव आर्ततेची तार सतत छेडत राहतो. त्यांची विरहिणी आपले हृदयभाव विविध तऱ्हांनी उलगडते. काळ्या कृष्णाशी नि:संग व नि:शंक होऊन ती ओढली गेली आहे. श्रीकृष्णाची कामारी होऊन त्याचे सहवाससुख ती भोगू इच्छिते. त्यासाठी पाचा, दामांचा घोंगडा नेसून, उरलेसुरले अन्न खाऊन राहण्याची तिची तयारी आहे. निरखून पाहता वृंदावनीचा कृष्ण तिला दिसतो आणि 'मनी वेधुवो तयाचा । पंढरीरायाचा' अशी अवस्था प्राप्त होते. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थातून विठ्ठलाची प्राप्ती होऊन तुर्यावस्था प्राप्त होते.

ज्ञानेश्वरांच्या विराण्याचा जेव्हा अभ्यास केला जातो तेव्हा त्याच्या विषयी निर्माण झालेल्या वादाचाही अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. कारण ह्या विराण्यामुळेच ज्ञानदेव एक की दोन हा वाद निर्माण झाला आहे. तेव्हा तोच प्रथम पाहण्याचा प्रयत्न करू.

***ज्ञानेश्वर : एक की दोन ?***

वारकरी संप्रदायात अभंगवाचनापेक्षा अभंग म्हणण्याचाच प्रघात अधिक आहे. त्यामुळे या अभंगांचे स्वरूप लेखननिविष्ट असण्यापेक्षा मुखनिविष्ट अधिक आहे. हे अभंग बहुतेक वारकऱ्यांना मुखोद्‌गतच असतात. मुखोद्‌गत पध्दतीनेच या अभंगांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आला आहे. त्यामुळे कालमानानुसार त्या-त्या पिढीचे शब्द,

भाषा, उच्चार यांचे संस्कार या अभंगवाणीवर होत गेले. आणि ती बरीचशी अर्वाचीन वाटू लागली. ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथातील प्राचीन भाषा आणि या अभंगातील अर्वाचीन दिसणारी भाषा यामध्ये फरक असल्याने ज्ञानेश्वर दुसरे असावेत, असा समज कांही विद्वानांचा होऊन ज्ञानेश्वर एक की दोन या वादाची निर्मिती झाली.

*'दोन ज्ञानेश्वर' या विषयीची मते -*

***भारदेबुवा उर्फ भारद्वाज -***

१. ''योगी ज्ञानेश्वर व भक्त ज्ञानदेव असे दोन महापुरुष झाले. योगी ज्ञानेश्वर हे आपेगावचे. हठयोगी, द्वैतवादी, निर्गुणोपासक होते. तर भक्त ज्ञानदेव हे आळंदीचे असून वैष्णवपंथी, भक्तिमार्गी अद्वैतवादी व सगुणोपासक होते.

२. योगी ज्ञानेश्वराने 'ज्ञानेश्वरी' लिहिली तिच्यामध्ये अनेक देव आहेत. विठ्ठल नाही, ज्ञानेश्वरीत एकही शब्द मुसलमान नाही.

३. योगी ज्ञानेश्वर व भक्त ज्ञानदेव असे दोन सत्पुरूष झाले. ज्ञानेश्वर शके १२०० मध्ये जन्मले. हे निवृत्तिनाथांचे पुत्र व शिष्य असून शैवपंथी होते. 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' हे दोन ग्रंथ लिहिले. व त्याचे तत्वज्ञान नाथपंथी असून निर्गुणोपासक आहे. तसेच घराण्यात अदिनाथ, मस्त्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, निवृत्तीनाथ, व ज्ञानेश्वर अशी गुरुपरंपरा आहे.

४. भक्त ज्ञानेश्वर हे शके १३०० मध्ये उदयास आले. त्यांच्या घराण्यात रामानुजदेवाचार्य, प्रज्ञानंद, राघवानंद, रामानंद, विठ्ठल, निवृत्ती, ज्ञानदेव अशी गुरूपरंपरा आहे. त्यांचे गीताटीका, पंचीकरण, चांगदेवपासष्टी इत्यादी रचना आहेत. भक्त ज्ञानदेव सगुणोपासक आहेत.

५. योगी ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ शके १२१२ मध्ये गोदावरीतील पंचक्रोशी क्षेत्री महालया या मंदिरात लिहिला.

६. योगी ज्ञानेश्वराने स्वसंतोषाने समाधी घेतली. ते स्वत: अभंगात नमूद केले आहे. यावरून ज्ञानेश्वर व ज्ञानदेव या दोन व्यक्ती भिन्न आहेत.

७. ज्ञानेश्वरीकार हे शैवपंथी होते. कारण ज्ञानेश्वरीत विठ्ठल नाही अभंगात विठ्ठल आहे. यावरून त्यांचे कर्तृत्व भिन्न आहे.

८. ज्ञानेश्वरी लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरांनी शृंगारिक अभंगाची निर्मिती करणे शक्य नाही.

वरील सर्व विवेचनात्मक मुद्दे भारद्वाज यांनी मांडले आहेत.[५]

***'ज्ञानदेव एक' याविषयीची मते -***

***शं. दा. पेंडसे -***

''ज्ञानेश्वरी अमृतानुभव, चांगदेवपासष्टी या ग्रंथाप्रमाणेच अभंगातही शून्यवाद, अनिर्वचनीयवाद, अज्ञानवाद, मायावाद, अद्वैतवाद सांगितलेला असून त्याचा व्यक्तिरेक दोन्ही पध्दतीने वर्णिलेला आहे. ज्ञानेश्वरी प्रमाणे कर्म-भक्ती योग ही साधने अभंगात आहेत. अभंगात सगुणभक्तीवर विशेषभर आहे. ज्ञानेश्वरीत ज्या गोष्टींचा विस्तार नाही त्या गोष्टींचा विस्तार अभंगात केला आहे.

''आम्ही एकदीन जाणा नाथपंथी''

किंवा

पंढरपूरचे आम्ही कापडी रे
कानडा विठ्ठल कर्नाटकु
येणे मज लाविले वेधी।

यावरून उत्तरेकडून आलेल्या नाथपंथाचे अनुयायी ज्ञानेश्वर दक्षिणेकडील भक्तिपंथाचे पुरस्कर्ते बनले व भक्तिमार्गाला अद्वैताच्या भक्कम भूमिकेवर उभे करून उत्तरेच्या दक्षिणेच्या तत्वज्ञानाचा आपल्या वाङ्मयात सुंदर समन्वय केलेला दिसून येतो. यावरून ज्ञानदेव एकच होऊन गेले.''[६]

***ल. रा. पांगारकर -***

'' 'ज्ञानेश्वरी व अभंग' यांच्या विचारसरणीत एकरूपता आहे. या दोन्हींचा आत्मा एकच आहे. ज्ञानेश्वरीत विठ्ठल नाही. अभंगात आहे. दोन्हीकडे कृष्णभक्तीचा धागा ओतप्रोत भरला आहे. ज्या मुखातून हे अभंग प्रकट झाले त्याच मुखातून ज्ञानेश्वरी प्रकट झाली. भाषा,

शब्द रचना, विचारसरणी, उपमा, दृष्टांत रूपकादी साहित्य अध्यात्म योगभक्ती इत्यादी सर्व बाजूंनी विचार करता ज्ञानेश्वरी कर्त्याहून अभंगकर्ते भिन्न नाहीत असे मानावयास हरकत नाही.''[७]

***श्री. म. माटे* -**

''ज्ञानेश्वरीकार हेच अभंगकार आहेत. संतमंडळींच्या अभंगातील प्रमाणाच्या आधारे स्पष्ट केले आहे. रेडयाकडून वेद बोलविणे, पाठीवर वळ उठणे, भिंत चालविणे इत्यादी गोष्टी आळंदीच्या ज्ञानदेवांशी संबंधीत आहेत. त्यावरून ते एकच आहेत.''[८]

***रा. श. वाळिंबे* -**

''नागर पदबंध कोवळा रसाळपणा, म्हणजे काव्य व काव्याभिरूची एक आहे. तसेच विचारांच्या दृष्टीने 'ज्ञानेश्वरी' व अभंग यात साम्य आहे. अभंगाची घडण रचनादृष्ट्या ओवीसारखी आहे. हे एकाचवेळी प्रचारात आले असे म्हणता येणार नाही. कोणत्याही भाषेत ग्रंथ सोप्या वृत्तात रचलेले असतात. तशी रचना ज्ञानदेवांची आहे. छंद हा प्रकार ज्ञानदेव काळात होता. म्हणून ज्ञानेश्वरीत भ्रमर, चातक, चकोर, मयूर, राजहंस, सुवर्णअलंकार असे दृष्टांत येतात. ज्ञानेश्वरीतील कृष्णभक्ती व अभंगातील कृष्णभक्ती सारखी आहे. शिवशक्ती प्रवृत्ती पुरुषविचार, संतमहिमा, नाममहिमा सारखा आहे. यावरून ज्ञानदेव एकच होऊन गेले.''[९]

***प्रा. कृ. वे. गजेंद्रगडकर* -**

''द्वैत अद्वैत वेदांताची मूलतत्वे साध्या व सोप्या भाषेत सांगितलेली आहेत. अभंगात नितीशास्त्र आहे. केवळ ध्येयाच्या बौध्दिक ज्ञानाने किंवा सद्‌गुण संपादनाने परमार्थ प्राप्त होत नाही. त्याला सद्‌गुरुचे सहाय्य पाहिजे. सद्‌गुरु वाचून परमार्थ नाही. तिसरा विषय सद्‌गुरुचे महत्त्व. या सदराखाली सामान्यवर्णन व विशेषत: निवृत्तीनाथांचे वर्णन येईल. सद्‌गुरुचे नाव घ्यावे व मग स्वत:च्या प्रयत्नाने व सद्‌गुरुच्या कृपेने परमार्थ साधता येतो. म्हणून परमार्थ साधनात नामस्मरणाचे महत्त्व आहे. या विषयीचे ज्ञान त्यांनी ज्ञानेश्वरीमध्ये व अभंगामध्ये दिले आहे. म्हणून ते एकच आहेत.''[१०]

***सोनोपंत दांडेकर -***

"ज्ञानदेव आपला योगमार्गातील अधिकार ओळखून होते. म्हणून त्यांनी भक्तियोगामध्ये असे महटले आहे. स्वत: मुक्त होऊन जो मुक्ती मिळवितो तो मला प्रिय आहे. हे विधान अत्यंत मोलाचे आहे. जे योगसाधना करतात त्यांना भक्ती करावीच लागते. ज्ञानदेवांचे जे अभंग आहेत त्यात अनेक अभंग योगानुभव सांगणारे आहेत. त्यातल्या काहीं अभंगांचा अर्थ लावणे कठीण आहे. यावरून अभंगकर्ते ज्ञानदेव वेगळे आहेत असे नाही. योगी वेगळा असतो, भक्त वेगळा असतो. ही कल्पनाच अज्ञानमूलक आहे. याचे कारण योगमार्गातील नाथपरंपरा व वैष्णवमार्गातील भक्तिपरंपरा या दोन्ही परंपरा एकच आहेत. ज्ञानेश्वरीमध्ये विठ्ठलाचा उल्लेख नाही. हा जो आक्षेप आहे तो बरोबर नाही. कारण कृष्ण आणि विठ्ठल एकच आहेत. कृष्णाचे दुसरे रूप विठ्ठल. त्यामुळे ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाचे वर्णन ज्ञानेश्वरीत केले असले तरी ते संपूर्ण पांडुरंगाचेच आहे."[११]

ज्ञानेश्वरीकर्ते आणि अभंगकर्ते हे 'ज्ञानेश्वर' एकच अहेत. याविषयी अधिक विवेचन करणे योग्य वाटते.

१. ज्ञानेश्वरी व अभंगामध्ये मांडलेल्या विचारात एकसूत्रता आहे. ९ व्या अध्यायाच्या प्रारंभीची ओवी अन् 'अवघाचि संसार सुखाचा करीन ।' या अभंगात साम्य आहे. विश्वकल्याणाची तळमळ त्यांच्या ग्रंथात आणि अभंगात दिसते. म्हणून ज्ञानदेव ही एकच व्यक्ती आहे.

२. नामदेव व ज्ञानदेव या दोन संतांनी एकत्र यात्रा केल्या. ज्ञानदेवांनी जेव्हा आळंदीला समाधी घेतली तेव्हा नामदेवांनी प्रेमापोठी व्याकूळ भाव आपल्या समाधीच्या अभंगात व्यक्त केला आहे. ज्ञानदेव समाधिस्त होताना ज्ञानेश्वरीतील अध्याय ९ वा त्यांनी समोर ठेवला होता. ज्यांनी तो ग्रंथ लिहिला त्यांनीच समाधी घेतली म्हणूनच ते हरिपाठामध्ये म्हणतात.

ज्ञानदेवा प्रमाण निवृत्ती देवी ज्ञान ।
समाधी संजिवन हरिपाठ ।

म्हणजे ज्ञानदेव ही एकच व्यक्ती आहे.

३. ज्ञानेश्वरी लिहिणारा कवी शृंगारिक विराणी लिहिणे शक्यच नाही असे गजेंद्रगडकर म्हणतात, पण ज्ञानेश्वरीतही शृंगारिक ओव्या दिसून येतात आणि अभंगातही काही अभंग तसे आहेत.

अर्जुना तो भक्त । तोचि योगु तोचि मुक्त
तो वल्लभा मी कांत । ऐसा पढिये । ज्ञाने. १२-१५६
गुरुगृह जये देशी । ते देशचि वसे मानसी
विरहिणी का जैसी । वल्लभाते ।

प्रा. गजेंद्रगडकरांचा विचार ग्राह्य धरला तर वरील ज्ञानेश्वरीतील ओव्या या ज्ञानदेवांच्या नाहीत असे म्हणणे योग्य होईल का ? म्हणजे ती व्यक्ती एकच आहे.

"या दोन्हीं काव्याचा आत्मा एकच आहे. ज्ञानेश्वरीचा वक्ताच अभंगात बोलत आहे. दोन्हींकडे कृष्णभक्तीचा धागा ओतप्रोत भरला आहे. तेच व्यापक ज्ञान, तोच भगवद्भक्तीचा जिव्हाळा, तेच आत्मसुखाचे उद्‌गार या दोन्हीमध्ये एकच दृश्य, एकच भाषा पध्दती, एकच कवित्व आहे. ज्ञानेश्वरी व अभंग सर्वस्वी आहेत. दोन्हीचा वक्ता एकच व ते म्हणजे ज्ञानेश्वर."[१२] असे आपले ठाम मत ल. रा. पांगारकर यांनी नोंदविले आहे. म्हणजे ज्ञानदेवांनीच अभंग, गौळणी विरहिणी व ज्ञानेश्वरी अमृतानुभव व चांगदेवपासष्टी हे ग्रंत्र लिहिले आहेत.

***विरहिणी -***

ज्ञानदेवांच्या ज्या काव्यलेखनाने जो मराठीत वाद झाला तो विरहिणीमुळेच. कारण या काव्यप्रकारात काही प्रमाणात शृंगारिकता आलेली आहे. ज्ञानेश्वरीकार हे शृंगारिक काव्य लिहिणे शक्यच नाही असे गजेंद्रगडकर म्हणतात. पण सर्व पुराव्याच्या आधारे हा मुद्दा पाठीमागे निकालात निघाला आहे. तेव्हा त्यांच्याच विराण्याही आहेत असे समजून त्यांच्या विराण्याचे स्वरूप पाहणे गरजेचे आहे.

*व्याख्या -*

"विराणीची रचना एखाद्या गीतासारखी धृपद आणि कडवे अशी दिसून येते. विरहाची उत्कंटता कायमची असल्याने त्याची लांबी फार दीर्घ नसते. आर्तभक्ती या प्रकारातून विराणी आकाराला आली आहे. विराणीचा आशय दृष्ट्या उगम गाथासप्तशतीत भागवतातील रांसपंचाध्यायी व भ्रमर गीतात दिसतो. मूलतः भावकविताच असलेली विरहिणी संतांच्या परतत्व समारूपतेच्या आकांक्षेने आणि उत्कट आर्ततेने भावकोमल स्वरांनी बंदिस्त झाली आहे. विराण्या या विराणीचे अनेकवचन. विराणी म्हणजे विरहात राहून परमात्म्याशी मिळू पाहणारी व्यक्ती. म्हणून विरहिणी किंवा विराणी म्हणतात."[१३]

विरह भावावर आधारलेला, विरहभाव प्रधान असलेला काव्यप्रकार म्हणजे विराण्या होत असे म्हटले तरी चालेल.

ज्ञानदेवाच्या बहुरूपी नि बहुरंगी गौळणींचा विचार करण्यापूर्वी तो परमात्मा श्रीकृष्ण (विठ्ठल) सोडून गेल्यावर तिची जी विरहावस्था आहे, तीच आपल्याला पहावयाची आहे. भक्ती रसातील गुढता आणि मानवी शृंगारातील उत्तानता यांचा सुंदर मिलाफ म्हणजेच ही विरहिणी आहे. आत्म्याचे व भक्तीचे मोठे गूढगुंजन आहे. ते आत्म्याचे नि परमात्म्याचे प्रेम आहे. स्त्री प्रेमाच्या या नात्यात शरीरापेक्षा मनाची ओढ विलक्षण आहे.

भक्तीत प्रेमपान्हा पाहिजे. पण प्रेम आले तिथे विरह आलाच, विरहाच्या वेळीच माणसाच्या खऱ्या प्रेमाची कसोटी लागते. विरहावस्थेत एक फार मोठे काव्य आहे. या अवस्थेत विधात्याने एक नाजूक रंग भरला आहे. भक्ती, प्रीती नि सौख्य यांचे गोड मिश्रण यात आहे. आपल्या प्रियतम माणसाची वाट पाहण्यातच फार मोठा आनंद असतो. एखाद्याच्या वाटेकडे तो येणार म्हणून डोळे लावण्यातच एक मोठे काव्य आहे. तो जवळ नसताना त्याचे गुणगाण गाण्यात एक गोडवा आहे. तो नसताना विरहावस्थेत होणाऱ्या व्यथेत जेवढा आनंद आहे तेवढा त्याच्या भेटीतही नाही.

मधूर स्वर कानी पडावा पण गाणारा दिसू नये. तसा तो नसतानाही त्याचे बोलणे ऐकू यावे. फुलांचा सुगंध यावा पण फूल दिसू नये. तशा त्याच्या सुंगधी आठवणी याव्यात. पण

त्यांचे दर्शन होऊ नये. चंद्र बघायला म्हणून खिडकीत जावे नि तो ढगाआड गेलेला असावा. बाहेर चाहूल लागली म्हणून दार उघडून दाराच्या चौकटीत उभे रहावे तर तो आलेलाच नसावा नि ती चाहूल फसवी ठरावी. ज्ञानदेवांच्या विराण्यात असे अनेक फसवे भास आहेत. या विराण्या वाचून रसिक नक्कीच भारावल्याशिवाय राहणार नाही. एका विरहिणीची अवस्था ज्ञानदेव व्यक्त करतात.

पडले दूर देशी मज आठवे मानशी ।
नको नको हा वियोग कष्ट होताति जीवाशी ।
दिनु तैसी रजनी झाली गे माये ।
अवस्था लावूनि गेला अजूनि का नये ।

खरोखर अशा विरहिणीची समजूत तर कशी काढावी ? वाऱ्याची साधी झुळूक आली तरी तिला वाटायचे की तो आला, ती म्हणते -

अवचिता परिमळु झुळकला आळुमाळु ।
मी म्हणे गोपाळू आला गे माये ।

रसिकराज ज्ञानेश्वरांच्या 'गे माये' ह्या शब्दावरून तर जीव ओवाळून टाकावा वाटतो. 'इश्श्य' हा शब्द जसा शृंगारात शोभतो तसा 'गे माये' हा शब्द विरहिणीच्या तोंडात शोभतो. तो काय ग ? म्हणून सखीने विचारले तर म्हणते, तो नाही ग, हा ही नाही.

'मग तो कसा आहे हे तरी सांग' म्हणून सखी विचारते तर ही विरहिणी म्हणते...

'सांगता न संगवे गुण'

मग त्याला शोधायला कुणाला पाठवू का ?

असे विचारले तर ती म्हणते नको, नको

''त्वचेचिया राना धाडू नको मना
तेथे नंदाचा कान्हा डोळात घाली गे माये ।''

त्याला शोधून आणू नकोस. असेच अनंत युगे नि अनंत काळ मला त्याच्या शोधात राहू दे, त्याच्या आठवणी काढता-काढताच मला झिजू दे. खरोखर किती खट्याळ आणि नाठाळ आहे तो

म्हणून सांगू ? त्याला पकडू गेले तर तो हाताला लागत नाही. पण हाताविना मी त्याला स्पर्श करते. तो स्वरूप सुंदर इतका नाजूक आहे की, माझ्या मऊ हाताचा स्पर्श त्याला सहन होत नाही. मग मी त्याला मनाने स्पर्श करते. माझ्या डोळ्यांनी कुरवाळते, काय सांगू तुला ! डोळे झाकले तर तो मला दिसत राहतो. काळ्या रात्री तो काळा श्याम माझ्याशी लंपडाव खेळत राहतो. हिरव्या रानी जसा हिरवा पोपट दिसतो तसा काळ्या रात्री तो माझ्या सावळ्या डोळ्यांना दिसत नाही.

अधिरतेने ऐकणारी तिची सखी म्हणते - 'अग, त्याचं नाव तरी सांग -

ती म्हणते - तो नामातीत आहे.

मग तो काळा का आहे ? त्याच्या रूपाचे तरी वर्णन कर.

तो रूपातीत आहे गं।'

सखी कपाळाला हात लावते. तिचे गोडाविण चाखणे नि जिव्हेविण बोलणे तिला कळत नाही. हातात दिवटा घेऊन अंधार शोधणे तिला जमत नाही. विश्वाची आर्तता मनात साठवून आधार देणाऱ्या सखीला ही ज्ञानोबाची विरहिणी सांगते -

'यातीकुळ माझे गेले हारपोनि।

श्रीरंगावाचूनि आनु नेणे।

थोडी रागावून नि थोडी त्रासून सखी बोलत नाही. त्यावेळी ही वेडी विरहिणी तिचे खांदे हालवीत तिलाच विचारते -

जयाचिये आवडी संसार त्याजिला।

तेणे का अबोला धरिला गे माये

त्यावर सखी रागावून म्हणाली - अग, मागच्या वेळी तो कंदबाच्या वनात तुला भेटायला आला होता, तर त्याच्याशी एक शब्दही तू बोलली नाही आणि आता विचारते 'तेणे का अबोला धरीला गे माये' विरहिणीच्या डोळ्यात पाणी असतानाही तिला हसू आलं, ती म्हणाली - 'होय गे तसे झाले खरे, पण मी तरी काय करू ?'

भेटीचेनि सुखे मनाचि होय मुके

ते रूप देखे परी बोलवेना।

खरंच, तो भेटला ना की, माझे सारे चित्त चोरून नेतो. त्याला पाहताना मी अगदी तन्मय होऊन जाते. त्याची आठवण हाच विचार होतो. अशावेळी तुम्ही मला काय सांगाल नि काय शिकवाल ?

वेधला जिऊ माझा शिकवाल काई

त्याच्या समोर असताना माझी मी नसतेच. माझे मीपणच सरते. अवघे प्रेम देऊन तो मला नि:संग करून टाकतो. तो नसताना वाटते तो भेटला की, त्याच्याशी खूप-खूप बोलावे. पण तो भेटला की वाचाच बंद होते. तो येणार म्हणून त्याच्या वाटेकडे तारवटलेल्या डोळ्यांनी ताणून पहावे, तर तो समोरासमोर आला की, तसेच डोळे मिटतात. त्याच्या भेटीने अमृत पिल्यासारखे वाटते. गात्रांना संजिवनी प्राप्त होते. इतरांना त्याची गोडी काय सांगायची. त्याच्या आठवणीने विश्वाचे आर्त माझ्या मनी दाटते. मनाच्या धुक्यात तो येऊन उभा राहतो. मी पानावर जेवते का धरतीवर जेवते तेच कळत नाही. इतकेच काय मी जेवते का तो जेवतो हे ही समजत नाही. माझे भाबडे प्रेम त्याला फार आवडते. त्याचा विचार हीच माझी आठवण होते. त्याची आठवण काढता-काढता तो मीच होते आणि वाटते की तो होऊन माझी वाट पाहत आहे. त्याची नि माझी अनंत युगाची गाठ आहे. ओढ आहे. कुठल्या शब्दात नी कशी मी ती व्यक्त करू. मध्येच ती सखीला म्हणते - 'ती खिडकी लावतेस जरा ?' 'चंद्रमा उबारा करतो गे माये' त्यावर ती म्हणते थांब अगोदर तुझ्या अंगाला चंदन लावते. तेव्हा ती व्याकुळपणे म्हणते -

न लावा चंदनु न घाला विंझणवारा।
हरिविण शून्य शेजारू गे माये।
चंदनाची चोळी माझे सर्वांग पोळी।
कान्हो वनमाळी वेगी भेटवा का।

विरहाने तिची अवस्था काय झाली आहे हे तिचे तिला कळत नाही, पण तिला कळावे आणि तिने शुध्दीवर यावे म्हणून सखीने तिच्या पुढे आरसा धरला तर ती म्हणते -

दर्पणी पाहता रूप न दिसे आपुले।
बापरखुमादेविवरू मज ऐसे केले।

ज्ञानदेवांच्या प्रतिभेचा इथे उत्कटबिंदू पहावयास मिळतो. त्या विरहिणीला बिचारीला आरशात स्वत:चे रूपही दिसत नाही. जो-जो उपचार सखी तिच्यावर करू पाहते त्याचा ती अव्हेर करीत म्हणते -

मज करा का उपचार अधिक तापभरू
सखिये शारंगधरू भेटवा का ।

कोणी अंगणात आले का ग ?

कोणी नाही,

पहा बरं, कारण तो आज येणार म्हणून मला सारखे शुभशकुन होत आहेत आणि 'शुभलवे लोचनी' - पहा बरं -

पैल तो गे काऊ कोकताहे
शकुन गे माये सांगताहे.

पुन्हा पहा बर तो अंगणी आला का ? आंब्याच्या डहाळीवर बसलेल्या त्या कावळ्याला विचार की, आमचे पाहुणे केव्हा येणार ? पाहुण्याचा निरोप सांगितलास तर म्हणावे, तुझ्या पायात सोन्याचा तोडा घालीन, तुझ्या पुढे दहीभात ठेवीन, रसाळ आंब्याची रास तुझ्यापुढे ओतीन, पण सांग आमचे पाहुणे येणार आहेत केव्हा ते ? कारण त्याच्या भेटीने अमृत पिल्यासारखे होते. तो आल्याने सुखाचा सुकाळ होतो. तो सुखाचे निधान आहे. तो गंगेहून पवित्र आहे. अमृताहून गोड आहे. चंदनाहून शीतळ आहे आणि सोन्याहून सुंदर आहे. तो आला की, रात्री सूर्य फुलतो आणि दिवसा चांदणे वाटते. त्याच्याकरिता तिला तहान-भूकेची पर्वा नाही, कुणाची लाज नाही की स्वत:चा अभिमान नाही. त्याचा उंबरठा ही तिची उशी आहे. त्याला पाहिलं की, मनाचा भावच खुंटतो, पाहणेच डोळे होतात.

परमेश्वराच्या सहवासातले सुखाचे क्षण सांगताना विरहिणी म्हणते

कवणा सांगू हे जीवीचे गुज ।
एखादे वेळी मज मारीतोसि ।

ज्ञानदेवांच्या या विरहिणीची जातच निराळी आहे. चितेवर जळणाऱ्या सतीप्रमाणे विरहात त्याच्या आवठणीने जळण्यातच तिला एक अवीट आनंद आहे. तिला कामाची ओढ नाही. कामभावनेने तो तिला नको आहे. 'उपजताचि देह मृत्युच्या तोंडी' याची तिला जाणीव आहे. म्हणूनच निराकार अशा ब्रह्मानंद स्वरूपाची तिला ओढ आहे. ती म्हणते -

स्वप्नीचे धन ते धनचि नव्हे ।

मृगजळीचे जळ ते जळचि नव्हे ।

तैसे विषय सुख हे सुखचि नव्हे ।

विषयसुख प्राप्त झाल्यावर त्याची क्षणिक गोडी संपून पुढे अनंत दुःख नि यातनाच आहेत. याची तिला जाणीव आहे. ते सुख क्षणिक आहे. म्हणून ती सखीला म्हणते -

जेथे अनुभवचि नाही तोचि तू पाही पाही ।

स्वानुभवी राही तुझी तुचि ।

सूर्यचंद्र एक झाल्यावर दिवस आणि रात्र दोन कसे राहणार ? त्याला भेटायला जाताना सुखाचि सुखच भेटायला येते. त्याला भेटताना त्याच्यापासून निराळे मुळी राहताच येत नाही. त्याचेच रूप शृंगारून त्याला भेटायला जायचे, त्याचेच डोळे होऊन त्याला पहायचे, त्याचीच जीभ होऊन त्याला बोलायचे, त्याचेच शरीर होऊन त्याच्या हृदयात लपायचे, त्याच्या भेटीची ओढ शब्दात सांगताच येणार नाही. सुमनांचा परिमळ कधी गुंफता येईल का ?

तणुचोरली कोठे मी पाहो ।

भूक लागली काय मी खावो ।

ज्याचा ध्यास घेतला तो सामोरा आला तेव्हा 'आजि सोनियाचा दिनु । वरी अमृताते वरषेघनु ।' असे ती आपल्या सखीला सांगते. दिवसभर ती त्याच्या विषयीच बडबडत होती. सोनियाचा दिवस आज अमृताने नाहताना मी पाहिला. तो आला म्हणजे मी त्याला मनसुमनांची माळ घालीन असे म्हणत ती नाचू लागली. नाचताना सखीला सांगू लागली -

तो तो मी गा । मी तो तो गा । सर्वादि सर्वसाक्ष तो गे बाई ।

मनमोहन तो गे बाई । सहजसुख निधान तो गे बाई ।

सांगता-सांगता विरहिणीने त्याचा निळा रंग घेतला - वीजेसारखा तो तिच्यामागे तळपू लागला, जीवशिव एकरूप झाले..

ज्ञानदेव निळी ह्वदयी सावळी।

प्रेमरसे कल्लोळी बुडी देत।

"ज्ञानदेवांची विरहिणी ही भक्तीची भैरवी आहे. संसार दुःख सुख विसरून तो ब्रह्ममय करून टाकणारी एक कृष्णशक्तीच आहे ती शक्ती जणू तिला गवसली होती. विरहाची रागदारी आळविताना तिला तिच्या जीवनात सुखाची किनार सापडली. मधुरभक्तीचा रसाळ ठेवा ज्ञानदेवाच्या विरहिणीत आहे. अमृताचा घट तिने आपल्या ह्वदयात लपविला आहे. तिचा अंतर्गाभा निरालस कृष्ण उपासनेचा आहे"[१४] असे प्र. न. जोशींनी व्यक्त केले आहे. तर वसंत जोशी म्हणतात "भक्तिसुखाचा अपूर्व अनुभव विरहिणीत व्यक्त झाला आहे. ज्ञानदेवी किंवा अमृतानुभवात अंग चोरून वावरणारे प्रापंचिक, शृंगारपूर्ण, दृष्टांत त्यांच्या विरहिणीत आपले आल्हादकारक स्वरूप मुक्तपणे प्रकट करतात."[१५]

## *ज्ञानदेवांची गौळण -*

'ज्ञानेश्वरांच्या गौळण या काव्यप्रकाराचा अभ्यास करताना त्यांच्या एकूण साहित्याचा, जीवनचरित्राचा अन् त्यांच्याविषयी निर्माण झालेला वादाचा परामर्श याच प्रकरणात सुरूवातीला घेतला आहे. अभ्यासाचा मुख्य विषय त्यांच्या गौळणींचा असल्याने आता फक्त गौळणींचा अभ्यास करणे उचित ठरेल.

## *स्वरूप -*

'विठ्ठल हे वारकरी संप्रदायाचे भक्ती दैवत असले तरी राम-कृष्ण या देवतांनाही त्यांनी विठ्ठलाप्रमाणेच स्थान दिले आहे. गौळण हा प्रकार कृष्णासंबंधी आहे. पण ज्ञानेश्वरांच्या गौळणीत कृष्ण आहे पण त्यापेक्षा विठ्ठलही आहे. म्हणजे रामकृष्ण विठ्ठल यांच्यात एकरूपता असून कधी-गौळणीत कृष्ण येतो तर कधी राम तर कधी विठ्ठलही येतो. या गोष्टीचा प्रत्यय संतांची गौळण अभ्यासताना येतो. ज्ञानदेवांची गौळण ही अशा मिश्र स्वरूपाची आहे.

कृष्णाविषयी असणारी प्रीती नि भक्ती व्यक्त करताना हृदयातील सारा जिव्हाळाच ज्ञानदेवांनी गौळणीमध्ये ओतला आहे. मग साधा जीवही 'जीवु' असे शब्दसुध्दा सुंदर झबले घालून बाहेर पडतो.

प्रेम हे देवाचे देणं आहे. ज्ञानदेव ज्याच्यावर प्रेम करतात तो नाना लीलाधारी आहे. ज्ञानदेवही त्याच्यापासून नाना नटनाट्य वेषाधारीपणाचा खेळ शिकले आहेत. ज्ञानदेव हे शब्दाचे उत्तम खेळाडू आहेत. ते शब्दांना खेळवितात, नि स्वत:ही त्यांच्याबरोबर खेळतात. कधी ते कोल्हाटी, बहुरूपी तर कधी वासुदेवही होतात. अनेक रागात देवाची भक्ती ते आळवितात. विठ्ठलाशी अनेक नाती ते जोडतात. कधी भक्तीचे, कधी सक्तीचे, कधी रागाने, अनुरागाने, कधी वेडावून, कधी भाराऊन, कधी चुलता तर कधी पालक म्हणून, कधी वल्लभ तर कधी प्रियकर म्हणून, कधी माता कधी कांता म्हणून, सुगृहिणी जसे एकाच वस्तूचे नाना पदार्थ करते तसे ज्ञानदेवांनी भक्तीचे नाना प्रकार गौळणीत केले आहेत.

ज्ञानेश्वरांचे व्यापकज्ञान, भगवद्भक्तिचा जिव्हाळा, आत्मसुखाचे उद्गार, गोपींचे कृष्णावरील विशुध्द प्रेम, यशोदेजवळ केलेली गोपींची गाऱ्हाणी, बोबडी गौळण, गौळणींनी व्यक्त केलेले कृष्णरूपसौंदर्य, अध्यात्माच्या भाषेत बोलणारी गौळण, द्वैत-अद्वैतच्या स्वरूपातील गौळण, श्रीकृष्णाच्या बालखोड्या इ. प्रकारात ज्ञानदेवांनी गौळणी लिहिलेल्या आहेत. काव्यदृष्टी, कोमलता व भक्तीचे माधुर्य यांचा उत्कट मिलाफ ज्ञानदेवांच्या गौळण काव्यप्रकारात झालेला आहे. 'सौभाग्य सुंदरू लावण्य सागरू' जो विठ्ठल त्यास ज्ञानेश्वरांनी परोपरीने आळविले. विरहभावनेनेही ज्ञानेश्वर व्याकूळ झालेले आहेत. ज्ञानदेवांच्या या कृष्णभक्तीचा परिचय त्यांच्या गौळणींचा अभ्यास केल्याशिवाय कळणार नाही. गौळणींचा अभ्यास सोयीचा व्हावा म्हणून ज्ञानदेवांच्या गौळणींचे प्रकार पाडणे योग्य होईल.

***श्रीकृष्णाचे स्वरूपमाधुर्य*** -

श्रीकृष्णाचे / विठ्ठलाचे विविधरंगी, विविधभावना कल्लोळातून ज्ञानेश्वरांनी चित्रिकरण केले आहे व वाचकांच्या मनात ठसविले आहे. गोकुळात जे बालकृष्ण रूप पाहून गोप-गोपी त्यांच्याकडे आकर्षित झाल्या, तेच बालरूप ज्ञानदेवांनी वर्णन केले आहे.

सुखाचे निधान । ते म्या हृदयी संपूर्ण साठविले गे माये ।
अवघे कृष्णरूप भरलेसे मानसी
दाऊनिया सकळ गुणी-गुणातीत । तुटली अधिरया ।
सुखी सुख मुरे प्रेम चिदानंद उरे ।

हे कृष्णवर्णन करताना ज्ञानदेव रंगून जातात. ज्याच्या मस्तकावर मोरपिसांचा तुरा आहे, मस्तकावर झाडांच्या कोवळ्या पानांचे घोस खोवलेले आहेत, दोन्ही ओठावर बासरी ठेवून हा श्रीहरी नंदराजाच्या गाई राखत बसला आहे. नानावेष धारण करून नटनाट्य करीत आहे. त्याच्या भोवती त्याचे सवंगडी उभे असून त्यांच्यात हा मोठ्या कुशलतेने तीन ठिकाणी वाकडा उभा राहिला आहे. असा हा सर्व सुखाचा साठा असून त्यालाच मी पूर्णपणे माझ्या हृदयात साठविला आहे. जी सौंदर्यसंपन्न अशी व्यक्ती असते तिलाच काहीजण हृदयात स्थान देतात. ज्ञानदेवांनी वर्णन केलेली ही गौळण अनेक रंग, रूप देऊन अनेक प्रकारांनी चित्रित केली आहे. त्यामुळे सर्व नाविन्याचा झगमगाट आहे. वर्णननेही सविस्तर पण हवीहवीशी वाटणारी आहेत, मनाला तृप्ती देणारी आहेत.

योगमायेची विलासे । उभा देहुडा पाऊली ।
तेथे दीप्ती जे उदेली तेजाकारे ।
गौळणी भरूनिया डोळे कैशा पाहाताती ।
अवघे कृष्णरूप भरलेसे मानसी ।

अशा कितीतरी प्रतिमा मनाचे ठाव घेतात. भक्तीच्या क्षेत्रात ज्ञानाशिवाय भक्ती करता येत नाही. भक्तिशिवाय ज्ञान मिळत नाही. अन् ब्रह्मज्ञानाशिवाय मुक्ती मिळत नाही. हाच ब्रह्मविद्येचा पुतळा साक्षात नंदराजाच्या घरच्या गाई यमुनेच्या काठावर चारत आहे. त्याला सदैव देशभान हरपून पहातच रहावे अशी इच्छा निर्माण झाल्याने चिताचा ठाव त्या सौंदर्याने घेतल्यामुळे गुरामागे चालणाऱ्या कृष्णाला गोकुळातील गौळणी पहातच बसतात.

आकाशाचा रंग जसा कधी-कधी सावळा दिसतो तसा श्रीकृष्ण सावळ्याला पाहताना गौळणींची अवस्था थोडी विचित्र होताना दिसते. ती त्याच्या रूपाला भुलली आहे. ती

सखीला विनवणी करीत आहे की सख्ये आतातरी सांग की तो कृष्ण कोणाच्या घरी जाऊन बसला आहे. चारीही दिशांना मी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण तो मला काही दिसला नाही.

सावळीये निळी भुलली एकी नारी । परेचा वो घरी शुध्दी पुसी ।
चव्हू मार्गी गेले न संपडे वाट । मग चैतन्याचा घाट वेंधलिचे ।

अशा सावळ्या श्रीहरिला भुलून जाणारी गौळण ज्ञानदेवांनी चित्रित केली आहे. वाचकांच्या मनाला सात्विकतेच्या पराकोटीला नेणारा प्रसंग ज्ञानदेवांनी गौळणींच्या माध्यमातून उभा केला आहे.

तुझिये निढळी कोटी चंद्रप्रकाशे । कमलनयन हास्य वदन हासे
हाल का रे कृष्णा डोल का रे । घडिये घडिये घडिये गुज बोल का रे ।

श्रीकृष्णवर्णनाच्या अनेक गौळणीमध्ये उच्च दर्जाची असणारी ही गौळण वाचकांना खरोखरच अंतर्मूख करताना दिसते. श्रीकृष्णाच्या निढळावर असणारा अंतरिक प्रकाश कोटी चंद्रप्रकाशाएवढा गौळणींना दिसतो. कमळाच्या पाकळ्यासारखे असणारे डोळे सदैव हसतात. अशा या बालरूपाला गौळणी विनवणी करतात. ''कृष्णा आमच्यासाठी काही हालचाल कर ना, आमच्या साठी डोल ना, आमच्या बरोबर वारंवार गुजगोष्टी कर ना'', गौळणींच्या मनाची ही अगतिकता ओळखून श्रीकृष्ण उभा राहून आपले दोन्हीं बाहू हालवत उभा राहतो. तो परमात्मा गौळणींना आपलासा वाटून त्याच्या चरणाशी त्या विलीन होतात.

ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाच्या रूपाचे वर्णन अत्यंत मनोहर रेखाटले आहे. त्याचाच सारखा ध्यास असल्याने त्या लावण्यमय चित्रास सुंदर उठाव आलेला आहे.

अनुपम्य मनोहर । कासे पितांबर ।
चरणी ब्रिदाचा तोडर । देखिला देव ।

या प्रकारच्या परमेश्वरास त्यांनी पाहिले. हाच विठ्ठल गोपीनाथ आहे. ज्ञानदेव म्हणतात 'मदनमूर्ती विश्वी अलंकारली । ते डोळा असूमाय जाली । परमेश्वराच्या या लावण्याकडे पाहवतही नाही इतके ते प्रखर आहे. याच भगवंताच्या 'अधरीचे अमृत । पिकलेसे ब्रह्मरसु । तेणे जाला सौरसु । गोपीजना गे माये । श्रीकृष्णाची सावळी मूर्ती पाहताच ज्ञानदेवांचे मन शांत झालेले दिसते. तेच गौळणींच्या मुखातून आपल्या अंतरीच्या भाव व्यक्त करतात.

नवल देखिले कृष्णरूप बिंब । सावळी स्वयंभ मूर्ती हरीची ।

मन निवाले समाधान झाले । कृष्णरूप वेधले मन माझे ।

श्रीकृष्णाच्या नीलवर्णाचा साक्षात्कार तर ज्ञानदेवांना पावलोपावली होत होता. 'निळीचे सारणी वाहे मोतियाचे पाणी । अशा अर्थाच्या ओळी बऱ्याच गौळणीमध्ये सापडतात. या काळ्या दादुल्याचे दर्शन ही अनेक ठिकाणी अनेक प्रकारे होत आहे. सुनिल वर्णाच्या कृष्णाचे रूप क्षणोक्षणी पालटणारे आहे. कधी यमुनेच्या तीरावर तो सावळी तनु धारण करून वेणू वाजवित आहे. त्याच्या मुरलीचा स्वर ऐकल्याबरोबर असे वाटते की, जणू आकाशातील मेघातून अमृताचा वर्षाव होत आहे. श्रीकृष्णाचे रूप किती मोहक आहे म्हणून सांगावे ? कपाळावर चंदनाचा सुंदर टिळा असून डोक्यावर मयूरपिसांची टोपी आहे. त्याच्या केसात कल्पतरूची फुले शोभून दिसतात. अशा या सौंदर्यमूर्तीला पाहूनच गोकुळातील गौळणी भूलून जातात. ज्ञानदेव भक्त असल्याने भक्ताचा भावच त्यांनी गौळणीतून व्यक्त केला आहे.

***ज्ञानदेवांची बोबडी गौळण*** -

संत नामदेवांप्रमाणे ज्ञानदेवानीही बालपणात बोलल्या जाणाऱ्या बोबड्या भाषेचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. लहान मुलाला अनेक शब्द स्पष्ट उच्चारता येत नाहीत. पण मोठी माणसे बोलतात त्यांचे अनुकरण करून ही लहान बालके बोलण्याचा प्रयत्न करतात. ते बोलताना सर्वानांच त्यांचे कौतुक वाटते. नामदेवांनी पेंद्याच्या माध्यमातून अनेक अभंगात आपला बालसुलभ भाव व्यक्त केला तो बोबड्या बोलातूनच. त्याचप्रमाणे ज्ञानदेवांनीही आपल्या लहानपणातील पांडुरंगविषयी असणारा भक्तिभाव त्यांच्या बोबड्या गौळणीमध्ये कलात्मकतेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संत नामदेवांनी बोबड्या भाषेत भक्तिभाव मांडण्यासाठी त्यांच्यासमोर पेंद्याचे चित्र उभे असलेले दिसते. मग मला प्रश्न पडतो. ज्ञानदेवांनी या गौळणीत कुणाला उभे केले असावे ? कारण या गौळणीमध्ये राधा नाही. एक लहान मुलगी आहे. या मुलीच्या वाटेला प्रथमच कृष्ण गेलेला आहे. बासरी वाजविणारा, खांद्यावर काळी कांबळी टाकून मधुबनात गोधने राखणारा, रखरखत्या उन्हात गौळणींची चेष्टा करणारा श्रीकृष्ण लहान मुलीने पाहिला असावा किंवा कुणा

एकीचा घडा त्याच्या अचूक नेमाने फुटताना पाहिला असेल. या लहान गौळणीने कृष्णाच्या खोड्या आपल्या भिरभिरत्या नजरेने पाहिल्या असतील. अन् त्या खोड्या पहात असतानाच तो तिच्याही वाटेला प्रथमच गेलेला असावा, तेव्हा ती थोडी बावरून, आपल्या लहानमोठ्या सख्यांना ती गमंत सांगते. या गौळणीचे चित्र उभे करीत असताना गोकुळातील लहान गौळण त्यांच्या पुढे उभी न राहता त्यांची धाकटी इवलीसी परकर नेसलेली, छातीवर चोलीची गाठ बांधणारी बहीण मुक्ता तर उभी नाही ना ? असा संभ्रम मलाही पडतो. मुक्ता कधी रूसली असेल, कधी आपल्या बोबड्या भाषेत तिने तिच्या ज्ञानदादाकडे कुणाची तरी तक्रार केली असेल. अन् कृष्ण भक्त ज्ञानदेवांनी तिचे नितांतरम्य चित्र आपल्या प्रतिभेने उभे केले असेल.

काय सांगू तू ते बाई काय सांगू तू ते.

जात होते यमुना पाणीया । वातेत भेतला सावला

दोईवल तोपी मयूलपुछाचि । खांद्यावली कांबला।

तेणे माझी केली तवाली । मग मी तिथून पलाली ।....

वरील गौळणींचा पूर्वाध कथनपर आहे. लहान गौळणींच्या वाटेला कृष्ण गेल्यामुळेच तिची जी अवस्था झाली तीच ज्ञानेशांनी तिच्याच शब्दात अगदी अचूकपणे नोंदविली आहे. पण या सर्वच प्रकारात ती आनंदून गेली आहे. गुडघे फुटून घागर फुटली तरी त्या गोड आठवणीने ती मोहित झाली आहे. या कथाभागात गोडी आहेच पण त्याचबरोबर एक दृश्यमात्र मात्र आहे. ती गौळण बोबडी होती. अन् आपणही बोबडे आहोत. परमेश्वर आई स्वरूप आहे. तर आपण त्याची लेकरे आहोत आपल्या कृत्रिम भाषेपेक्षा ती बोबडी भाषा गोड वाटते शिवाय दुसऱ्या अर्थाने म्हणजे ज्याला देवापुढे बोलण्याची नि देवाला प्रिय असणारी वाणी बोलता येत नाही तो बोबडाच आहे.

या बोबड्या गौळणीची कृष्णावर अपूर्व भक्ती आहे. बोबड्या गौळणीच्या निष्ठेने आपण श्रीकृष्णावर प्रेम केले तर आपल्या खोड्या काढूनही (संसारातील संकटे) तो आपल्याला जवळ धरील. आपल्याला पोटाशी धरील.

निवृत्तीचे कृपे सुख ज्ञानदेवा लाधले।

मुक्ताबाईचे मिसे ज्ञानदेव गहिवरले ।

ज्ञानदेवांच्या या बोबड्या गौळणीचे बोल म्हणजे खडी साखरेचे खडे आहेत. ज्ञानदेव-नामदेवांनी निर्माण केलेले हे बोबडे बोल भागवतात नाहीत, महाभारतात नाहीत, कृष्णचरित्रात नाहीत, पुराणातही नाहीत, ते फक्त संतगाथेतच आहेत अन् त्यातील ही बोबडी गौळण वाचकांना आपल्याकडे आकर्षित करून घेते. इतकी तिच्यात गुरूत्वाकर्षणाची शक्ती आहे.

*गाऱ्हाणी विषयक गौळणी* -

ज्ञानदेवांच्या गौळणींची कृष्णविषयक गाऱ्हाणी कौतुकमिश्रित वात्सल्याने भरलेल्या आहेत. व अध्यात्माच्या स्तरावरही वावरतात. या गाऱ्हाणी सांगताना गोकुळातील इतर मुलांशी कृष्णाची तुलना करतात. त्या म्हणतात - घरोघरी लेकरे काय नसतात काय ? त्या मुलांवर घरातील माणसे काय प्रेम करीत नाहीत काय ? पण कृष्ण हा सर्वापेक्षा वेगळाच आहे. गाऱ्हाणी जरी त्या करीत असल्या तरी त्याच्याशिवाय त्यांना करमत नाही, ही वस्तुस्थिति आहे. तो नंदाचा कान्हा मजपुढे येऊन उभा राहतो. माझ्या सर्वांगाचा झाडा घेतो. त्याच्या या कृत्याने मी खरोखरच कासावीस झाले आहे. तो बाळसेदार कान्हा मजपुढे आला की त्याच्याकडे पाहतच रहावेसे वाटते. तोच खरा तर माझ्या हृदयाचा ठोका होऊन जातो. तुरूतुरू चालत येणारा इवल्या-इवल्या जिवणीतून तो जे बोबडे बोल बोलतो तेच मला वेडे करतात. असा हा नभांचा नभ असणारा, पंढरीच्या विटेवर दोन्ही हात कटेवर ठेवून उभा असणारा हा कान्हा, या गौळणीला कान्हा व विठ्ठल एकच भासत आहे. याच्या नवलाला प्रथमच गौळणी भुलतात. अन् त्याच्या अंगझटी येतात. पण तो परमात्मा असल्याने त्याच्यापुढे या दमून-भागून जातात. शेवटी तो पुन्हा आपल्या दृष्टीपुढे यावा म्हणूनच त्या त्याच्याविषयी गाऱ्हाणी सांगण्यासाठी यशोदेकडे जातात. खरा भावार्थ त्यांचा वेगळाच आहे. ज्ञानदेव म्हणतात -

गाऱ्हाण्याचेनि मिसे गौळणी उचंबळता हे ब्रह्मरसे
वानवसे चोपसे कृष्णाचेनि
मायाभूत एक मोहरे देवपण धाडिले अनुरे
भावो की देवो बैसवाल धुरे पुसे निवृत्तिदासू -

मराठी गौळणीत गाऱ्हाणीविषयक अनेक गौळणी आहेत. पण ज्ञानदेवांची गौळण सर्वांपेक्षा भिन्न आहे. तक्रारी करतानाच अध्यात्माच्या स्तरावर वावरताना दिसतात. हेच त्यांच्या गौळणींचे विशेष म्हणावे लागेल. ते म्हणतात - डोक्यावर गोरसाचा माठ घेऊन मुरडत-मुरडत मथूरेच्या मार्गाने जाणाऱ्या गौळणींना श्रीकृष्ण त्यांना आडवतो. त्यांची चेष्टा करतो - माठ फोडतो, तरी सुध्दा त्या त्यालाच भाळतात. त्याला पाहता क्षणीच माझे मनुष्यपण सरले. इतकी शक्ती त्याच्या दर्शनात आहे. माझे मनच त्याच्यावर लुब्ध झाले आहे. अद्वैताच्या भूमिकेत तो आता मला दिसतच नाही. मी द्वैत निवडत बसले आहे. त्याच्या दर्शनाने माझा जन्म-मरणाचा फेराच चुकला आहे. मी देहमुक्त झाले. जीवा-शिवाचे मीलन झाल्याशिवाय मनुष्य देहमुक्त होत नाही. हाच सिध्दांत त्यांनी मांडला आहे. परमेश्वराशी संगनमत करणारे जीव फारच थोडे आहेत. भक्ती ही साधी सोपी नाही. ती सुळावरील पोळी आहे. तो सर्व त्रास सहन करून मी मुक्त होऊ पाहते. वाटेत भेटलेला कृष्णच माझ्या चित्तात आहे. आता मथूरेच्या बाजारात करमेल का ? त्याच्या दर्शनाने माझी भ्रांती नष्ट झाली आहे. जीव-शिव एक झाला. याच अवस्थेत त्याने मला भोगून संसारमुक्त केले. हेच गाऱ्हाणे उच्च पातळीवर जाऊन ज्ञानदेव मांडतात.

फिटले भ्रांती पडळ । दोन्ही एक जाली । बाप रखुमादेविवरी ।

अवस्था लावूनी पुरी । भावे भोगूनी श्रीहरी । मनमुक्त साजणी वो ।

गोकुळात बालपणी विविध खोड्या श्रीकृष्णाने केल्या. त्याची गाऱ्हाणी हा संतकवींच्या मुख्य गौळणींचा विषय होता. बालकृष्ण हा गोकुळवासीयांचा आवडीचा व भक्तीचा विषय असल्याने जनमानसात त्याचा लौकिक असल्याने त्याच्या बाललीला संतांनी अत्यंत भक्तिभावाने नमूद केलेल्या आहेत. ज्ञानदेव म्हणतात - हा कृष्ण रांगत-रांगत येतो आणि आमच्या घरचे लोणी चोरतो. तेव्हा त्याच्या पाठीमागे धावत जाऊन गौळणी त्याला धरू पाहतात. पण तो सापडत नाही. म्हणून त्याच्या आईजवळ गौळणी गाऱ्हाणी सांगण्यासाठी नंदराजाच्या वाड्यात जातात. यशोदेला त्या कळवळून सांगतात की तुझा कृष्णा तान्हा बाई जास्तच अवखळ आहे. त्याला आता तरी आवर घाल बाई.

रांगतु रंगणी चोरितु लोणी धावोनि धरीती गौळणी

बांधती चरणी देती गाऱ्हाणी यशोदे साजणी

दधि धृत भक्षून तमालनिळे नवल केले साजणी

अशी गाऱ्हाणी यशोदेकडे सांगतात. त्याची विविध नावे घेऊन त्या म्हणतात - नेणवसी नेणवसी। आकळू तू नाकळसी। परंतु त्यांचे रूपगुणवर्णन करीत असतातनाच त्यांना 'जाणितले जाणितले। माझे मज दिधले ।' असा प्रत्यय येतो आणि 'एकी म्हणति याने उभाचि कवळू' अशी ओढ निर्माण होते.

***द्वैत अद्वैत गौळणी -***

अद्वैत म्हणजे चर्मचक्षूनी जे रूप गौळणींनी गोकुळामध्ये पाहिले त्याच सावळ्याने ज्या रूपाने लीला केल्या त्याचा अंतर्भाव जवळजवळ सर्वच संतानी आपल्या गौळणीमध्ये केला आहे. 'अद्वैत' शब्दाची व्याख्या दुसरी ही सांगता येईल. देव व भक्तांमध्ये फरक नसतो. द्वैत म्हणजे देव भक्तामध्ये अंतर असने, ज्ञानदेवांची गौळण ही द्वैती स्वरूपात असून अद्वैत्याची अपेक्षा करीत आहे. ज्ञानदेवांची जडण-घडण ही योगसाधनेतून झाली आहे. त्यांनी परमेश्वराची रूपे जाणली आहेत. म्हणून त्यांच्या काही गौळणीतून हा द्वैत अद्वैत विचार आलेला आहे.

ज्ञानदेवांची गौळण डोईवर दहीदूध घेऊन मथूरेच्या बाजारी जाते पण त्यामध्येही तिला कृष्णच दिसतो. बाजारात त्या फिरताना कृष्णाशी तादात्म्य पावल्या आहेत.

दुडिवरी दुडी गौळणी साते निघाली।

गौळणी गोरसु म्हणो विसरली।......।

गोविंद गोरसु एकचि नांवा।

गोरसु विकू आले तुमच्या गावा।

प्रस्तुत गौळणीमध्ये सर्वच गोष्टीत गौळणींना कृष्णा दिसत आहे. हीच अवस्था भक्त ज्ञानदेवांचीही झालेली असावी. तीच अवस्था शब्दरूपाने साकार झाली असावी. कधी-कधी तिची अवस्था या दोन्हींच्या पलिकडे जाते. डोईवरल्या माठात दहीदूध न घेता ज्ञानामृत घेऊन ती बाजाराला निघाली आहे. ब्रह्मरसाने भरलेला तिचा माठ, अंतःकरणात उंचबळत असणारे

भक्तिप्रेम, हंसासारखी ऐटदार चालत ती बाजाराला निघाली आहे. म्हणजे तिने तन मन धन त्याला अर्पण करूनच ती त्याच्या स्वरूपात विलीन होण्यासाठी चालली आहे. पण तोच वाटेत तिला भेटतो तेव्हा तिला नवल वाटते. तिला आजूनही खात्री नाही की तोच परमात्मा समोर उभा आहे. पण शेवटी खात्री पटते. ज्याच्यासाठी मन वेडे झाले होते, पण आता मनच पांगळे झाले त्या स्वरूपाला पाहताक्षणीच तिचे मनुष्यपण संपले.

'बिंबी बिंबतसे निज हे जिवन हाचि जाला।
आता नाही मज उरी हा तंव बाहुजु भीतरी
अवघी अंतरली दुरी गेले मनुष्यपण।

प्रस्तुत गौळणीचे मनुष्यपण तर संपले त्याच बरोबर ती संसार तापातूनही मुक्त झाली आहे. जन्ममरणाच्या पलीकडे जाऊन ती पोहोचली आहे. तिच्या मुखातील येणारा शब्दही मावळला आहे. स्त्री-पुरुष हा लिंगभेद तर राहिलाच नाही. परमेश्वराच्या ठिकाणी या लिंगभेदाला स्थान नाही. जीवा-शिवाचे मीलन झाले म्हणजे तेथे काहीच शिल्लक राहत नाही. सर्व इंद्रियासहित परमात्मा आपलासा करतो.

केले आपलिया ऐसे या इंद्रियासहित।
पूर्ण चैतन्य भोगिले हे तंव दुजे निमाले।
बापरखुमादेविवर विठ्ठलेसी भेटी।
आजी संसारा संसाटी घेऊनि गेला।

परमेश्वराच्या स्वरूपात विलीन झालेल्या गौळणींची अवस्था ज्ञानदेवांनी वरील गौळणीत चित्रित केली आहे.

ज्ञान हेचि गाय दुध दुहिले भरणा ।
दोही तया जाणा हातु नाही।
ठेविले अग्नीवरी अग्नी नाही भितरी।
तापले पडिभरी साय नाही ।

वरील गौळणीतून ज्ञानदेवांनी तर वेगळाच विचार प्रतिपादला आहे. आत्मज्ञानाने परिपूर्ण झालेली ही गौळण वाचकांना विचार करावयाला भाग पाडते. ब्राह्मज्ञानाशिवाय मुक्ती नाही. हेच ब्रह्मज्ञानरूपी दूध त्यांनी चुलीवर तापविण्यासाठी ठेवले आहे. लौकिक जीवनामध्ये दूध तापले असता त्यावर साय येते. पण हे दूध तापल्यावर त्यावर साय कशी येणार ? पण ज्या अग्निवरती दूध तापविले तो अग्नि तरी वास्तवात आहेत काय ? पण तेच दूध ज्ञानदेवांची गौळण विकावयास ठेवते. बाजारात तूप, लोणी विकण्यासाठी ती दूधाचे घुसळण करते. पण त्या घुसळण्याच्या प्रकारात दहीदूध नाही. रवी सुध्दा नाही. तिचा विचारच पूर्ण वेगळा आहे. आपल्या संसाराच्या घुसळणीतून फक्त परमात्माच प्राप्त करून घेतला आहे. तिच्या जवळ आलेल्या गिऱ्हाईकाला ती कोणते तूप-ताक विकणार आहे. वाटेने चालताना तिला अनेक गौळणी विचारतात की तू आज काय विकणार आहे ? त्यांना तरी ती काय विकणार म्हणून सांगणार आहे. ती ठामपणे इतर गौळणींना सांगते की, आज मी खऱ्या अर्थाने परमेश्वराशी दान जाणार आहे. मीच त्याला विकले जाणार आहे. म्हणजे सर्वसंग परित्यागाने ती परमेश्वराशी विलीन होण्यासाठी चालली आहे. मग तिच्या मनात आता द्वैती भाव असून ही ती अद्वैत विचारात रंगलेली आहे.

ऐसी पावली मथुरा क्षण न लगे विकरा ।
सवेचि एकसरा उपरवा झाला ।
बापरखुमादेविवरू विठ्ठलु ग्राहिकु ।
मानसी गोरसु ज्ञानेसि मिळोनि गेला ।

म्हणजे जो भक्त ब्राह्मज्ञान प्राप्त करून घेतो तोच जन्ममरणाचा संसार चुकवू शकतो. हाच विषय गौळणींच्या माध्यमातून ज्ञानदेवांनी मांडला आहे.

***योगानुभवात्मक गौळणी -***

परमेश्वराची भक्ती दोन मार्गाने केली जाते. १) योगमार्ग २) भक्तीमार्ग. यापैकी कोणत्याही मार्गाने परमेश्वराजवळ जाता येते. ज्ञानदेवांचा मूळ संप्रदाय हा नाथपंथ आहे. या पंथात योगमार्गाचा अवलंब केला जातो. सर्वसामान्य साधकाला हा मार्ग पेलत नाही. म्हणून १२व्या अध्यायात ज्ञानदेवांनी सांसारिकांना भक्तीमार्ग सांगितला. पण त्यांनी मात्र योगमार्गाने

परमेश्वराची प्राप्ती करून घेतली आहे. हे ज्ञान गुरूशिवाय मिळत नाही. गुरु निवृत्तीनाथांनी दिलेली शिकवण ज्ञानदेवांनी अनेक गौळणीत मांडली आहे. गुरुकडून मिळालेल्या या ज्ञानाचे घुसळण ज्ञानेशांची गौळण करीत आहे. योगमार्गाचा अवलंबही गौळण करीत आहे. गुरुमंत्राच्या रवीचा वापर करून शरीरातील विचाररूपी डेऱ्यात मध्यभागी पंचप्राणांचे चांगले मंथन केले. प्राणनिरोधन केले, ईडा, पिंगला व कुंडलिनी या त्रिवेणीची ब्रह्मसूत्राची दोरी करून मंथन सुरू झाले की, अनुहत ध्वनीने चिदाकाशात गर्जना होत राहिल्या. चैतन्यरूपी आकाशात असे एकसारखे मंथन केले तर त्यातील एक थेंबही बाहेर पडत नाही. परमात्म्याशिवाय प्रपंचवृत्तीच उरत नाही. पण बहुतेक सर्व लोक प्रपंचाच्या धुंदीत आंधळे होतात व या गोरसाची गोडी जाणीतच नाहीत. शरीररूपी नगरात, प्रभुप्रेमात रमलेली ही गौळण इंद्रियरूपी नऊ दारे बंद करून ज्ञान प्रकट झालेल्या दहाव्या दारात येऊन या गोविंदास मिळाली आहे.

दशवेद्वारी पातली कैसी विनटली गोविंदी वो ।

दंभ विकरा जाला अधर्म धर्म लोपला वो ।

अवघी काया झांकुळली बापरखुमादेविवरा विठ्ठली वो ।

पंचप्राणावर विजय मिळवून ईडा, पिंगळा आणि शेवटी ईद्रियांचे दहावेद्वार उघडून कुंडलिनी जागी करावी लागते. ही नाडी जागृत करणाऱ्या या गौळणी केव्हाच लौकिकातून परलौकिकात पोहोचल्या आहेत. ही अवस्था प्राप्त करताना त्यांना फार मोठ्या संकटांना सामोरे जावे लागले आहे. शरीर धर्म संभाळणाऱ्या व्यक्तीला ही अवस्था प्राप्त करून परमेश्वराशी विलीन होणे सहज शक्य होत नाही. म्हणून या गौळणी बुध्दीरूपी सखीला विनवणी करतात. आता आम्ही ज्या स्वरूपात विलीन झालो त्याच स्वरूपात अखंड राहू दे. पुन्हा आम्हाला शरीर धर्म पाळण्यास / स्वीकारण्यास भाग पाडू नको. तो धर्म मला आता स्वीकारावासा वाटत नाही. कारण पूर्वजन्माचा मला अनुभव आहे. जर का मी शरीर धर्म स्वीकारून एकदा मृत्युलोकात गेले म्हणजे तो नंदाला कान्हा माझी खोडी करतो, माझा अचुळा धरतो, त्याच्या खोड्या मला आता सहन होत नाहीत म्हणून ती म्हणते -

त्वचेचिया राना धाडू नको मना।

तेथे नंदाचा कान्हा डोळा घाली गो माये।

त्या कृष्णाने मला पूर्वजन्मात एकटीला गाठून माझी मुटकुळी केली पण त्याच्या तावडीतून सुटून मी पळत इथपर्यंत आली आहे. तो कसा आहे, त्याने अंगात काय घातले आहे. याचेही वर्णन ही गौळण करीत आहे. त्याच्या गळ्यात गुंजमाळांची गाठ बांधली आहे. डोक्यावर मोरपिसारा आहे. असा तो देखणा पोर माझ्या मागे पळत आहे. मला चुंबन दे म्हणतो आहे. पण शेवटी मी पळून दमून-भागून गेले शेवटी त्याने मला पकडलेच. माझ्यावर चुंबनाचा वर्षाव केला, पण माझी अवस्था वेगळीच झाली. त्यांच्या चुंबनाने नि त्याला अलिंगन दिल्याने मी खरोखरच देहमुक्त झाले. त्याने मला स्पर्शावे, माझे चुंबन घ्यावे, हेच माझे पूर्वपुण्य असावे असे ती म्हणते.

पूर्वपुण्य फळाले देहमुक्त झाले

बापरखुमादेविवर विठ्ठले ऐसे केले गो आई यो।

श्रीकृष्णाच्या आलिंगनाने देहमुक्त झालेली वरील गौळण पुन्हा देहावर येते पण ज्या हरीने तिचे चुंबन घेतले, गोड अलिंगन दिले, त्या सुखाला पुन्हा तिचे मन उत्सुक आहे. पुन्हा-पुन्हा तो अनुभव तिला घ्यावासा वाटतो. म्हणून ती लौकिक संसाराची मर्यादा ओलांडून स्वत:चे असणारे मनुष्यपण बाजूला सारून ती गौळण त्याच्या भेटीसाठी निघाली आहे.

टाकूनी आले तुजपासी।

थिते मुकलिये मनुष्यपणासी।

तिला लौकिक जीवनाची भीती वाटत नाही. आपणच आपली सुटका-मुक्ती करून घ्यावी म्हणून ती खरी विठ्ठलाची दासी झालेली आहे. ती विठ्ठलाला म्हणते की - आता मला संसाराचा उबग आला आहे. मला यातून तुम्ही मुक्त करा, मी लौकिक संसारावर पाणी सोडून तुमची दासी होण्यासाठी आले आहे. तेव्हा आता मला तुम्ही दूर लोटू नका हो, ही विनवणी ज्ञानदेवांची गौळण परमात्म्याशी करीत आहे.

संसार साऊला माझा पालट्टनि देसी।

बापरखुमादेविवरा विठ्ठला गुणराशी।

मानवी देह प्राप्त झाल्यानंतर या देहातून मुक्त होणे हे त्या जीवाचे मुख्य कर्तव्य असते. पण अनेक मानवी जीव या कर्तव्याला जागताना दिसत नाही. पण ज्ञानदेवांनी गौळणीत मांडलेली गौळण मात्र हे कर्तव्य काटेकोरपणे संभाळत आहे. संसारात क्षणभंगूर असणारे सुख पण याच सुखाला न चिकटता ती चिरकाल अस्तित्वात असणाऱ्या सुखाच्या पाठीमागे लागलेली आहे. ते सुख परमेश्वराशिवाय दुसरे कोणीही देऊ शकणार नाही. हे तिला माहीत आहे. म्हणून ती त्याच्या जास्तीत-जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याची कृपा झाल्याशिवाय या जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मी मुक्त होणार नाही म्हणून ती त्याची दासीपण ही आनंदाने स्वीकारताना दिसते. भक्त ज्ञानदेवांच्या अंत:करणातील भावच त्यांनी आपल्या गौळणीतून मांडला आहे.

***गौळणीतील प्रतीक व प्रतिमा*** -

'गौळण' हा लोककाव्याशी निगडीत असाणारा प्रकार आहे. भक्तिरसाशी निगडीत आहे. नवरसाच्या पलीकडे असणारा हा भक्तीरस गौळणीत आहे. भक्तीरसाचा अनुभव 'भाव' आहे. गौळणीच्या अंतकरणातील प्रेमभाव हा या काव्यप्रकाराचा विशेष आहे. यामध्ये साधने पासून साक्षात्कारापर्यंतचा संपूर्ण प्रवास आहे. हा प्रवास ज्ञानदेवांच्या उत्कंट अनुभूतीचे दर्शन घडवितो. हे दर्शन घडविण्यासाठी ज्ञानदेवांनी जीव-शिव, भक्त-परमेश्वर यासाठी गोपी-कृष्णाची प्रतीके वापरलेली दिसतात. ज्ञानदेवांच्या काही गौळणींची भाषा ही गुढ स्वरूपाची आहे. गुढ काव्याचा आविष्कार प्रतीकाविना होऊ शकत नाही म्हणून ज्ञानदेवांनी गौळणीत गोपींच्या प्रतीकेतून श्रीकृष्णाविषयीचा भक्तिभाव अनेक प्रतिकाद्वारे प्रकट केला आहे.

काव्याची भाषा ही प्रतिमांची भाषा असते. प्रतिमा ही काव्यभाषेची सामग्री असते. अशा सामुग्रीतून ज्ञानदेवांची गौळण साकार झालेली आहे. त्यातील शब्द हे न राहता प्रतिमा म्हणून समोर येतात.

बापरखुमादेविवरू सावळी प्रतिमा ।
मने मनी क्षमा एक झाले.

प्रस्तुत गौळणीत श्रीकृष्णाच्या रूपाचे वर्णन करताना ते सावळ्या रंगाच्या प्रतिमेतून व्यक्त

करतात. सावळिये बुंथी सावळिया रूपे । सांवळ्या स्वरूपे वेधियेले । अशा अनेक गौळणीत 'सावळी' प्रतिमा ते वापरतात.

गोविंद गोरसु एकचि नावा ।

गोरस विकू आले तुमच्या गावा ।

या गौळणीत गौळणींची भावप्रतिमा ते व्यक्त करतात. गौळणींचा श्रीकृष्णाविषयीचा भाव, तिची तन्मयअवस्था, गोरसामध्ये श्रीकृष्णाची, गोविंदाची उमटलेली प्रतिमा ज्ञानदेव चित्रित करतात. मथूरेला जाणाऱ्या गौळणी ह्या नेहमी डोक्यावर गोरसाची दुरडी / माठ घेऊन जातात, वाटेत कृष्ण त्यांना भेटतो व त्या कृष्णाशी समरूप होतात. त्यामध्ये जीवा-शिवाचे एकरूपकत्व होते. हेच तत्त्व ज्ञानदेवांनी अनेक प्रतिमांच्या आधारे व्यक्त केले आहे.

***गौळणींची भाषा शैली -***

ज्ञानदेवांच्या गौळणींची भाषा प्रसादगुण, सहजोद्‌गार कधी साधे-सोपे शब्द तर कधी कठीण शब्द यांनी युक्त आहे. आध्यात्मिक भाषेतूनच त्यांची गौळणी बोलताना दिसते. योगानुभवातून काही गौळणींची निर्मिती झाल्याने कधी-कधी त्यांची गौळण समजण्यास अवघड जाते. तर सामान्य गौळणींच्या तोंडून येणारे सहजोद्‌गारही चटकन लक्षात येतात.

बरवा वो हरी बरवा वो । गोविंद गोपाळु गुणरूपा वो ।

सांवळा वो हरी सांवळा वो । मदन मोहन कान्हा गोवळा वो ।

यामध्ये भजन प्रकाराची गेयता आहे, चाल आहे. तसेच बरवा, पढीये, गोवळा असे सुंदर वाटणारे शब्दही आहेत. 'वो' हे संबोधन पुन्हा-पुन्हा आले आहे हे संबोधन एकाक्षरी असले तरी त्याचे ध्वन्यार्थ अनेक आहेत. तसेच 'गे माये', 'रमा', 'रे आयो' हे उद्‌गारवाचक शब्दही आहेत.

ज्ञानदेवांनी कृष्णाची निरनिराळी नावे अभंगातून आशयानुरूप योजली आहेत. विशेषनामे म्हणजे विशेषणेच आलेली आहेत. गौळण-विरहिणीमध्ये दामोदर, सावळा, श्रीरंग, विठ्ठल या नावांनी आळविले आहे. तर 'काळा लंपडाई काळे रात्री खेळे । मी सवे वेधिला जाये । काळ्यासंगे । म्हणून कृष्णाला काळा हे नाव आले आहे. 'बापरखुमादेविवरू विठ्ठल' हे नाव सर्वच अभंगात आहे. ती ज्ञानदेवांची नाममुद्रा आहे. 'विठ्ठल' हे परमदैवत वारकरी संप्रदायाचे आराध्य

दैवत आहे. विठ्ठल हा देव सामान्यांचा, त्याच्या ठिकाणी उच्च-नीच भाव नाही. ज्ञानदेवांना भक्तिमार्गाचा प्रसार जनसामान्यांतही करावयाचा असल्याने शेतकऱ्यांच्या काळ्या वावरासारख्या काळ्या विठ्ठलाची आराधना केली आहे.

ज्ञानदेवांच्या एकूणच साहित्याची भाषा यादवकालीन आहे. त्यामुळे त्यातील भाषेचे व शब्दाचे पडसाद अभंगात व गौळणीत उमटलेले आहेत. सहज आत्माविष्कार, लोकाभिमुखता, असल्याने बोली भाषेतील शब्द विपुल आहेत. ते सर्व यादवकालीन बोलीभाषेतील आहेत. काही शब्द तर महानुभाव साहित्यातील शब्दाशी साम्य असणारे आहेत. नाटकीचा कुंदासा, तेणेमाने फुंदो पाहे. काळतिमा, भेठो, अचोज हा अंबुला, साचपणा कारणे माता वधिली, पदनु काय पंथु शोधनिया चाले ? असे अनेक पदबंध गाथेतील गौळणीत सापडतात.

अभंगाची भाषा प्रतिमांची, शब्दांची आहे. तीव्र व तरल अनुभूती व्यक्त करताना ज्ञानदेव प्रतिमाद्वारे त्यांना मूर्त स्वरूप देतात. गौळणीत शब्दांचे आकृतिबंध तयार झाले आहेत. ज्ञानदेवांच्या संवेदना जागृत असल्यामुळे संवेदनाच्या परिभाषेत त्यांनी अनुभूतीचे आविष्करण केले आहे. हे आविष्करण म्हणजे प्रतिमा, भावना, कल्पना आणि संवेदना यांच्या एकत्रीकरणातून प्रतिमा तयार झाल्या आहेत. सामान्यांना समजेल अशी ती प्रतिमा आहे. वाचकाने कुठेतरी पाहिलेली, अनुभवलेली युक्त अशी भाषा त्यांनी काही गौळणीतून मांडलेली आहे.

***चिंतनात्मक भाषा शैली -***

ज्ञानदेव हे साक्षात्कारी कवी आहेत. गुढरूप पावणाऱ्या त्यांच्या काही गौळणींचे वाचन करताना यासंबंधीची आपणास विशेष जाणीव होते. मात्र या गौळणीत गुढकाव्य असा केवळ निर्देश केल्याने त्यांचे स्वरूप स्पष्ट होते. वस्तुतः गुढवाद व काव्य ही जाणीवांची दोन क्षेत्रे आहेत. त्यातील वेगळेपण अढळ असून त्याचे अद्वैत झाल्याचे आपणास गुढवादाच्या परिशीलनात वारंवार जाणवते.

गुढवाद आणि काव्य यांना साधणारा दुवा म्हणजे मानवी चिंतनशील मन होय. त्याच्याच आश्रयाने ही दोन क्षेत्रे परस्परास छेदून जातात. परिणामी चिंतनशील मनाच्या चिंतनानुभावाच्या आविष्कारास गुढात्म काव्याचे रूप लाभते. मात्र हे चिंतनशील मन

प्रतिभासंपन्न कविमन असावयास हवे. ज्ञानदेवांच्या गौळणींना काव्यात्म चिंतनाचे व चिंतनात्मक काव्याचे रूप व गुढात्मक काव्याचे रूपही प्राप्त झाले आहे. ज्ञानदेवांच्या गौळणीतून प्रकटणारे मन एक चिंतनशील मन असून ते प्रधान्याने 'परमात्मा' सन्मुख असलेले आहे. प्रत्येक चिंतनानुभवाचा स्वतःचाच असा असाणारा बंध लक्षात घेवून तो शब्दांकित करण्यात ज्ञानदेवांचे मन विशेषत्त्वाने रस घेताना दिसते.

ज्ञानदेवांच्या गौळणीतून प्रकटणारा अनुभव हा विश्वाचा 'परमात्मा' केंद्रबिंदु आहे. वस्तुतः परमात्मा या कल्पनेत गुढत्व अलौकिकत्व भरून राहिले आहे. परमात्म्याच्या स्वरूपात भासणारी अलौकिकता, अनाकलनीयता, ज्ञानदेवांच्या मनात स्तिमित करताना दिसते. ज्ञान-अज्ञान, व्यक्त-अव्यक्त, साकार-निराकार, सगुण-निर्गुण अशी द्वंद्वात्मक रूपे धारण करणाऱ्या परमेश्वरासंबंधी चिंतनानुभवाचे रूपही अपूर्व, अभिजात, अनपेक्षित व विस्मयकारक असले तरी आश्चर्य ही विस्मयता गौळणींची विशेषता मानली आले. ''ज्ञानदेव चिंतनानुभवात, जीवनानुभवात रमावे तसे रमातत. त्यांच्या संवेदनाक्षम मनाला जाणवणारा चिंतनानुभव मुलतः एक विशुध्द कलारूप धारण करताना दिसतो. भगवंताच्या ठायी अस्तित्त्व असणे म्हणजे भक्ती होय. भगवंताच्या रूपगुणावर आसक्त होणे, विरहाने व्याकुळ होणे याला भक्ती म्हणतात. आत्मसमर्पण करणे, द्वैताकडून अद्वैताकडे जाणे, काया वाचा मन या गुणांनी भक्त भगवंताकडे वळतो. तेव्हा शृंगाराला माधुर्य येते. त्यातुनच मधुराभक्ती साकार होते. येथे शृंगाराच्या नाजूक छटा दिसतात. शृंगाराच्या परिभाषेत परब्रह्माच्या मीलनासाठी 'गौळण' आतुर झाल्याचे चित्रण जेव्हा करतात तेव्हा उत्कट भक्तिभावाने थबथबलेले अध्यात्म दिसते.''[१६] असा अभिप्राय ज्ञानदेवांच्या चिंतनात्मक भाषा शैली बद्दल स. रा. गाडगीळ यांनी दिला आहे. यावरून हेच स्पष्ट होते की, ज्ञानदेवांनी जे कांही काव्य लेखन केले त्यांचे त्यांनी चिंतन केलेले दिसून येते.

***ज्ञानदेवांच्या गौळणीचे प्रयोगरूप*** -

ज्ञानदेवांची गौळण ही प्रामुख्याने भजन-कीर्तनामध्येच गायली जाते. त्यांच्या गौळणींची भाषा काही प्रमाणात उच्च पातळीची असल्यामुळे सर्वसामान्य त्या गौळणी म्हणताना दिसत नाही. सर्वच संतांच्या गौळणींचा विषय श्रीकृष्ण-गोपी असल्यामुळे त्याच विषयातील

गौळणी प्रसंगानुरूप कीर्तनकार काल्याच्या कीर्तनामध्ये एकनाथांच्या गौळणी म्हणताना दिसतात. कारण त्यांच्या भाषेमध्ये बऱ्याच प्रमाणात शृंगार असल्यामुळे लोकांनाही त्या आवडतात. ज्ञानदेवांची गौळण मात्र 'हरिनाम सप्ताह' मध्ये 'गाथाभजन' नावाचा जो प्रकार आहे त्या भजनात ज्ञानदेवांची गौळण म्हणण्याची पूर्व परंपरा आहे. तुकारामांच्या गाथेतील अभंग चालीवर म्हणून 'ज्ञानेश्वर माऊली' च्या भजनानंतर ही गौळण म्हटली जाते. टाळकरी उभे असतात, वीणेकरी मध्यभागी उभा असतो. टाळ, वीणा, मृदंग यांच्या साथीत ही गौळण सामुदायिक पध्दतीने म्हटली जाते. त्याप्रसंगी टाळकरी व इतर मंडळींना नेहमीचाच पोशाख असतो. ही गौळण म्हणण्यापाठीमागे ज्ञानदेवांविषयीच्या भक्तिभाव वारकरी मंडळींकडून व्यक्त होताना दिसतो. गौळण म्हणणाऱ्यांचा अभिनय बेताचा असतो. अन्य प्रयोगरूप कला प्रकारांमध्ये ज्या स्वरूपात नाट्याचा आविष्कार होतो, तसा नाट्याविष्कार गौळणीत आढळत नाही.

***सारांश -***

विठ्ठलपंत व रूक्मिणी यांच्या पोटी जन्मलेल्या ज्ञानेश्वरांनी भागवत मंदिराचा पाया घातला. वयाच्या १६व्या वर्षी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर भाष्य म्हणून ९००० ओव्यांचा परमसुंदर असा 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ लिहून आपल्या वाङ्मय कर्तत्वाला प्रारंभ केला. त्यानंतर 'अमृतानुभव व चांगदेवपासष्टी' हे ग्रंथ लिहून आपल्या 'तत्वज्ञान व काव्य' या गुणांचा प्रत्यय घडवून दाखविला. संत नामदेवांसमवेत तीर्थयात्रा करीत असताना त्यांच्या अभंगवाणीची निर्मिती झालेली असावी असे वाटते. त्यांची अभंगवाणी ही प्रवचन-कीर्तनासाठी जन्माला ओलेली आहे असा विचारही आलीकडे रूढ होत आहे. हा विचारही योग्य आहे असे वाटते. कारण सर्वांनाच वाचायाला येते असे नाही. कीर्तन-प्रवचनाला जाणारा वर्ग हा एकसारखा नसतो. त्यामध्ये सुशिक्षितांबरोबर जास्त अशिक्षितही असतात. प्रवचन-कीर्तनाच्या माध्यामातून तत्त्वज्ञान, भक्तीविषय ज्ञान त्यांना मिळण्यासाठी ही त्यांची अभंगवाणी जन्मली असावी. त्यांच्या लेखनाचे प्रयोजन कोणतेही असो पण भावनेची आर्तता, कल्पनेची विशालता अन् शब्दांची सुकुमारता या त्रिवेणी गुणांचा संगम झाल्याने त्यांच्या एकूणच काव्याने मराठी वाङ्मयात उच्च दर्जाचे स्थान मिळविले आहे. हे पांगारकरांचे मत ग्राह्य धरावे लागते. ज्या आत्माविष्कारातून त्यांच्या काव्यांची

निर्मिती झाली. त्याविषयी तर मराठीमध्ये फारच मोठा वाद निर्माण झाला. 'ज्ञानदेव एक की दोन ?' या वादाचे आद्यापही निरसन झालेले दिसत नाही. असे जरी असले तरी ज्ञानेश्वरी ते गौळण विरहिणी पर्यंतच्या त्यांच्या काव्यात एकसूत्रता असल्यामुळे ज्ञानेश्वरी कर्त्यानेच गौळण विरहिणी लिहिल्या आहेत असे मला तरी वाटते.

ज्ञानदेवांची गौळण ही आत्माविष्कारातून जन्माला आलेली आहे. 'गौळण' काव्यप्रकार श्रोतृसापेक्ष आहे. जनमनाशी संवाद साधणारा आहे. पण इतरांच्या व 'गौळण' काव्यप्रकारापेक्षा ज्ञानदेवांच्या काही गौळणी थोड्या फार वेगळ्या आहेत. त्यांची गौळण कधी आत्मस्वरूपात विलीन होते. परमात्म्याशी संवाद साधताना दिसते. तत्वज्ञानाच्या भाषेत बोलते. त्यांची भाषा ही उच्चपातळीची असल्यामुळे सर्वसामान्यांना लवकर आकलन होत नाही. ती कधी कृष्णाचे स्वरूपवर्णन करते तर कधी त्याच्याशी हितागुज करते. कृष्णाने केलेल्या खोड्यांची गाऱ्हाणी यशोदेजवळ सांगते तर मथूरेला दहीदूध विकायला गेल्यावर कृष्णमय होताना दिसते. तर कधी ज्ञानामृताचे माठ होऊन मथूरेला विकावयास जाते. श्रीकृष्णाच्या स्वरूपात विलीन होऊ पाहणाऱ्या गौळणीची भावावस्था ज्ञानदेवांनी अनेक प्रतिमांचा वापर करून तत्कालीन बोलीतून व्यक्त केली आहे. तरीपण त्यामध्ये गुढ अर्थ असल्याने ती सामान्यांना चटकन आकलन होत नाही. पण सर्वच गौळणी तत्वचिंतनात्मक आहेत असे मात्र म्हणता येत नाही. काही गौळणींची भाषा अगदी साधी सोपी आहे. ज्ञानदेव एक उत्तम भक्त होते. गोपींनी जसे कृष्णावर प्रेम केले अन त्या त्याच्या स्वरूपात विलीन झाल्या तीच धारणा ज्ञानदेवांची असावी. म्हणूनच भक्तिभावनेतून, श्रीकृष्णप्रेमातून त्यांची गौळण जन्माला आली असावी. वारकरी संप्रदयातील मंडळी ह्या भक्तिभावापोटी ज्ञानदेवांच्या गौळणीचे गायन आजही करताना दिसतात. सर्व भाविकभक्त या भक्तीरसात न्हाऊन निघतात.

# संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | तुळपुळे, शं. गो. | पाच संतकवी, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. २५ |
| २. | तत्रैव | उनि, पृ. २७ |
| ३. | रानडे, रा. द. | संतवचनामृत, श्री गुरूदेव रानडे ट्रस्ट, विजापूर, १९८६, पृ. १४ |
| ४. | तुळपुळे, शं. गो. | पाच संतकवी, व्हीनस प्रकाशन- पुणे, १९६२, पृ. ११८ |
| ५. | भारदे, बुवा | 'सुधारक' मासिक - १९९८-१९९९, पृ. १४ ते १६ |
| ६. | पेंडसे, शं. दा. | ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान, कॉन्टिमेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.-१९६९ |
| ७. | पांगारकर, ल. रा. | ज्ञानेश्वरांची प्रभावळ, विदर्भ बुक कंपनी १९७८, आवृत्ती-2, पृ. ६७ |
| ८. | माटे, श्री. म. | संत पंत तंत साहित्य, ठोकळ प्रकाशन, प्रथमावृत्ती - १९५७, पृ.३९ |
| ९. | वाळिंबे, रा. शं. | ज्ञानेश्वरीतील विद्ग्ध रसवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७०, पृ. ५४ |
| १०. | गजेंद्रगडकर, कृ. वे. | ज्ञानेश्वर दर्शन, साहित्य खंड - १, १९७६, पृ. ३०९ |
| ११. | दांडेकर,शं.वा. (सं) | सार्थ ज्ञानेश्वरी, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी, १९५५ |
| १२. | पांगारकर, ल. रा. | मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड - १, संपादक 'मुमुक्षु' नाशीक क्षेत्र, १९६२ |
| १३. | जोशी, प्र. न. | मराठी साहित्यातील मधुराभक्ती, व्हीनस प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती, १९५७, पृ. २४३ |
| १४. | जोशी, प्र. न. | फुलेच झाली भ्रमर, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७४, पृ. ३६ |
| १५. | जोशी, वसंत | मराठी गौळण, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८८, पृ.१९ |
| १६. | गाडगीळ, स. शं. | मधुराभक्ती आणि मराठी साहित्य, नवभारत, सप्टे.१९६२, पृ. २३ |
| १७. | जोशी, वसंत | मराठी गौळण, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ.१९८८, पृ.१४ |